सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन



# महाराष्ट्र राज्याचे
# क्रीडा धोरण
# २०१२

क्रीडा व युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य

# - : प्रास्तविक : -

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे हे जाणून क्रीडा धोरण जाहीर करणारे, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. खेळाच्या पुरेशा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याने पुढाकार घेतलेला आहे. सन १९९६ व २००१ च्या क्रीडा धोरणामध्ये अनुक्रमे **खेळाडू व खेळाव्दारे सर्वांसाठी सुदृढता** या बाबीं केंद्रभूत करुन क्रीडा धोरण तयार करण्यात आले होते.

राज्याचे क्रीडा धोरण २००१ व त्यानंतर हे क्रीडा क्षेत्रात झालेले विविध बदल राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ चे पुणे येथील आयोजन,राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०१० दिल्ली यांचे आयोजन व इतर आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील देशाची प्रगती त्याचबरोबर श्री.भिष्मराज बाम यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती आढावा समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशींचा विचार करुन, राज्याच्या क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीकरिता, नवीन क्रीडा धोरण ठरविण्यास सहाय्यभुत होणा-या सर्वकष शिफारशी करण्यासाठी दि.२० फेब्रुवारी, २०१० रोजी मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती. राज्यातील क्रीडाप्रेमी नागरीक, खेळाडू, एकविध क्रीडा संघटना, क्रीडा संस्था तसेच विधान मंडळाच्या सदस्यांच्या सूचना विचारात घेऊन समितीने क्रीडा धोरणाचा मसुदा अहवाल शासनास सादर केला होता. धोरण समितीने सादर केलेला मसुदा विचारात घेवून राज्याचे क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आले आहे.

खेळाच्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणे आवश्यक असल्याने राज्यातील क्रीडा प्रशिक्षकांसाठी अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख, चर्चासत्र, परिसंवादाचे आयोजन करणे, क्रीडा विद्यापीठाची स्थापना करुन क्रीडा विषयक अभ्यासक्रमात सुसुत्रता, संशोधन , राज्य क्रीडा विकास निधी सक्षम करणे, साहसी खेळांना प्रोत्साहन, क्रीडा विषयक पायाभूत सुविधांचा विकास,क्रीडा वातावरण निर्मीती, इ.बाबीचा विचार या क्रीडा धोरणात करण्यात आलेला आहे.

राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य रहावे, नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी, राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंचा गौरव, दर्जेदार क्रीडा सुविधा या बाबी केंद्रबिंदू मानून खेळाडूंसाठी हितावह योजना राज्यात राबविण्यासाठी क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आलेले आहे.



सत्यमेव जयते

## मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य

दिनांक- ५ जून, २०१२

## शुभेच्छा

क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा धोरण हे पुस्तक स्वरुपामध्ये प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला.

क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार जोपासना आणि प्रतिभावंत खेळाडू तयार व्हावेत, यासाठी क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, याचा मला अभिमान आहे. राज्याने नेहमीच खेळ आणि खेळाडूंसाठी पोषक वातावरण निर्माण केले आहे. त्याबरोबरच खेळासाठी पुरेशा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याने नेहमीच पुढाकार घेतला आहे.

राज्यामध्ये क्रीडाक्षेत्राला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी, तसेच नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊनच क्रीडा धोरण जाहीर करण्यात आले आहे. प्रस्तावित क्रीडा धोरणात राज्यातील खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाडूंच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार सुविधा, खेळाडूंचा गौरव या बाबी केंद्रबिंदू मानून खेळाडूंसाठी हिताच्या शिफारशी व उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

आज प्रत्येक खेळात तंत्रज्ञानाचा उपयोग केला जात आहे. खेळाच्या विकासासाठी आणि तंत्रशुध्द क्रीडापटू तयार करण्यासाठी हे पाऊल योग्य आहे. खेळाच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणे आवश्यक आहे. खेळाडूं सोबतच क्रीडा प्रशिक्षकांसाठी अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख, चर्चासत्र, परिसंवाद आयोजित करण्याचे क्रीडा धोरणामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

या क्रीडा धोरणानूसार भारतीय खेळासोबतच इनडोअर खेळ, शालेय शिक्षण व खेळ, आऊटडोअर स्पोर्टस्, ॲडव्हेंचर व वॉटर स्पोर्टस्, क्रीडा संस्कृती वाढविणे आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करण्यासाठी उपसमित्या गठीत करुन एक समृध्द क्रीडा धोरण राज्याला देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

या उपक्रमास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**(पृथ्वीराज चव्हाण)**



सत्यमेव जयते

# उपमुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य

दिनांक - ७ जून, २०१२

## शुभेच्छा

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने राज्याचे नवीन क्रीडा धोरण पुस्तिकेच्या स्वरुपात प्रकाशित करण्यात येणार असल्याचे समजून आनंद झाला.

महाराष्ट्र राज्याने क्रीडा धोरण जाहीर करुन अग्रेसर राज्य म्हणून असलेला आपला नावलौकिक कायम ठेवला आहे. मुलांमध्ये लहानपणापासूनच क्रीडा प्रकारांविषयी आवड निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी क्रीडा वाङमय निर्मिती, क्रीडा विद्यापीठाची स्थापना, साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देण्याबरोबरच खेळाडूंना आर्थिक सहाय्य करण्याचे देखील यामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या मातीतून ऑलिंपिक पदकविजेते घडावेत या हेतूने जाहीर करण्यात आलेले हे क्रीडा धोरण देशाच्या क्रीडा इतिहासातील मैलाचा दगड ठरेल, अशी मला अपेक्षा आहे.

ही पुस्तिका राज्यातील क्रीडा संस्था आणि क्रीडापटू यांना मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**( अजित पवार )**

मंत्री



मंत्री,
**क्रीडा व युवक कल्याण**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

दिनांक- १६ जून, २०१२

## !! शुभ संदेश !!

सुदृढ शरीरात निरोगी मनाचा निवास असतो ही बाब सर्वज्ञात आहे त्यामुळे सध्याच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात खेळाव्दारे सुदृढता हा मूलमंत्र सर्वांसाठी उपयुक्त ठरणारा आहे. महाराष्ट्र हे क्रीडा क्षेत्रात अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या क्रीडा संस्कृती व क्रीडा परंपरेची जपणूक करुन संवर्धन करण्याचे उद्दिष्ट राज्याचे क्रीडा धोरण-२०१२ मध्ये आहे.

क्रीडा विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती, अत्याधुनिक प्रशिक्षण, खेळाडूंना आर्थिक सहाय्य, प्रोत्साहन, क्रीडा महोत्सवाचे आयोजन, क्रीडा विद्यापीठाची स्थापना, साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन तसेच क्रीडा विकासाचे कार्य करणा-या संस्थांना प्रोत्साहन इत्यादी बाबींचा समावेश राज्याच्या नवीन क्रीडा धोरणात आहे. बदल, नावीन्य हा प्रगती व विकासाचा स्थायीभाव असतो. क्रीडा क्षेत्रात नवे बदल, नवी दिशा देणा-या या सर्वसमावेशक क्रीडा धोरणामुळे महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय व ऑलिम्पिक दर्जाचे पदक विजेते खेळाडू तयार होण्यास मदत होईल. नवीन क्रीडा धोरणाची पुस्तिका ही खेळाडू, क्रीडा संघटना व क्रीडाप्रेमी रसिकांसाठी मार्गदर्शक तसेच उपयुक्त माहितीचा संग्रहणीय असा दस्तावेज ठरेल, असा मला विश्वास आहे.

राज्याचा नवीन क्रीडा धोरणास तसेच या निमित्ताने प्रकाशित होणा-या धोरण पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**( पद्‌माकर वळवी )**

राज्य मंत्री
सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य



**राज्यमंत्री,**

नगरविकास, वने, बंदरे, खार जमीन, संसदीय कार्य,
क्रीडा व युवक कल्याण व माजी सैनिकांचे कल्याण,
विधी व न्याय आणि मत्सव्यवसाय

महाराष्ट्र शासन
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

दिनांक- २० जून, २०१२

# शु भे च्छा ...

शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राज्याचे क्रीडा धोरण-२०१२ पुस्तिकेच्या स्वरुपात प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद वाटला.

खेळाडूंनी आधुनिक तंत्रज्ञानाचा व जागतिक स्तरावरील बदलांचा मागोवा घेणे आवश्यक आहे. या पुस्तिकेच्या माध्यमातून राज्यातील पारंपारिक खेळासोबतच आंतरराष्ट्रीय खेळाचाही सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने विविध योजनांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या माहितीच्या संकलनासाठी योगदान दिलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे प्रथम अभिनंदन करतो. ही माहिती पुस्तिका क्रीडा क्षेत्रात काम करणा-या सर्व घटकांना निश्चितच उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल. पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती, अत्याधुनिक प्रशिक्षण, खेळाडूंना आर्थिक सहाय्य, प्रोत्साहन इ. विविध योजनांमुळे सुदृढ नागरीकांसोबतच, स्पर्धाक्षम व आधुनिक तंत्र आत्मसात केलेले खेळाडू निर्माण होवून क्रीडा व सर्व क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर राहील , या तिळमात्र शंका नाही.

राज्याच्या क्रीडा धोरण-२०१२ यास तसेच या निमित्ताने प्रकाशित होणा-या माहिती पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**( भास्कर जाधव )**

महाराष्ट्र
शासन

**जयन्त कुमार बाँठिया**
मुख्य सचिव



मुख्य सचिवांचे कार्यालय
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक १९ जून,२०१२

## शुभेच्छा संदेश

राज्यातील क्रीडा संकृतीचा दर्जात्मक विकास होण्यासाठी राज्य शासनाने नवीन क्रीडा धोरणास नुकतीच मान्यता दिली आहे. क्रीडा विकासाला पोषक अशा स्वरुपाच्या या धोरणात पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबर खेळाडूंना प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच या धोरणाच्या अनुषंगाने प्रशासकीय सुचनाही स्वतंत्रपणे निर्गमित होत आहेत, हे समजले. यामुळे राज्यातील खेळाडूंना अनेक प्रकारच्या सवलती मिळतील तसेच सेवा-सुविधा उपलब्ध होतील.

या धोरणांतर्गत राज्यात महाराष्ट्र राज्य क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मंजूरी दिली असून यासाठी एकूण २५०.५५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. शाळेमध्ये सध्या असलेल्या शिक्षकांना शारीरिक शिक्षणाचे प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमतावृध्दी केली जाईल. असे प्रशिक्षण देण्यासाठीही २.११ कोटी रुपयांचा निधी राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिला जाईल.

आमदार स्थानिक निधीतून क्रीडा विषयक उपक्रमांबरोबर खेळाडूंना १ लाख रुपयांपर्यंतचे वैयक्तीक क्रीडा साहित्य खरेदी करता येईल तसेच २ लाख रुपयांपर्यंतचा वैद्यकीय उपचार देखील करता येईल. या सुधारणेसही शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे राज्यात उत्तम खेळाडू निर्माण होण्यास मदत होईल, असा मला विश्वास आहे.

सध्या इयत्ता दहावी आणि बारावीमध्ये खेळाडू अनुत्तीर्ण होत असेल तर २५ मार्क वाढीव देऊन त्यास उत्तीर्ण करण्यात येते. त्याऐवजी स्पर्धानिहाय खेळाडूंनी मिळविलेल्या प्राविण्यानुसार गुणांची विगतवारी करुन राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसाठी २५ गुणांची सवलत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षांमध्ये देण्याचा महत्त्वपूर्ण बदल शासनाने या धोरणात केला आहे. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडूंना ख-या अर्थाने प्रोत्साहन मिळेल, असेही मला येथे नमूद करावेसे वाटते.

क्रीडा धोरणाची उत्तम अंमलबजावणी व्हावी म्हणून मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. हे सर्व पाहता, राज्य हे इतर क्षेत्राप्रमाणे क्रीडाक्षेत्रातही अग्रेसर राहील आणि राज्याचे खेळाडू राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळवून राज्याचे आणि देशाचा नावलौकिक वाढवतील यात शंका नाही.

हे धोरण अधिक प्रभावीपणे राबविले जावे या अपेक्षेसह माझ्या या क्रीडा धोरणास आणि त्यांच्या अंमलबजावणीस हार्दिक शुभेच्छा.

(जयन्त कुमार बाँठिया)

ज. स. सहारीया
अपर मुख्य सचिव



शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय मुंबई ४०० ०३२


# शुभेच्छा

राज्याचे स्वतंत्र क्रीडा धोरण सन १९९६ मध्ये निश्चित करुन क्रीडा विकासाच्या भरीव योजनांची आखणी महाराष्ट्र राज्याने देशात सर्वप्रथम केली. यानंतर सन २००१ चे क्रीडा धोरण व त्यातील योजनांच्या अंमलबजावणीमुळे राज्याच्या क्रीडा विकासास गती प्राप्त झाली आहे. दरम्यानच्या काळात राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा विश्वात झालेले बदल विचारात घेऊन अद्ययावत क्रीडा धोरणाची आखणी गरजेची होती. या पार्श्वभूमीवर राज्याचे क्रीडा धोरण-२०१२ घोषित झाले आहे. या धोरणामध्य क्रीडा विकासासाठी विविध योजना नमूद आहेत. खेळाडूंमध्ये पदक प्राप्तीसाठी स्पर्धा निर्माण होऊन राज्याचे नाव उज्वल व्हावे, या हेतूने आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणा-या खेळाडूंना रोख पारितोषिकांची कायमस्वरुपी योजना धोरणात नमूद आहे. याशिवाय स्पोर्टस नर्सरी, खेळाडूंच्या पालकांना रजा सवलत, क्रीडा संहिता निर्मिती यांप्रमाणे नावीन्यपूर्ण ठरणा-या विविध बाबी या धोरणात समाविष्ट आहेत. या धोरणातील सर्व योजनांचा लाभ घेऊन क्रीडा क्षेत्रात अग्रेसर असणारे महाराष्ट्र राज्य आपल्या यशाचा आलेख उंचावता ठेवील असा मला विश्वास आहे. या सर्व उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी, धोरणाच्या अंमलबजावणी व लाभाशी निगडीत सर्व घटकांना, क्रीडा धोरण -२०१२ पुस्तिका संपूर्ण मार्गदर्शक ठरावी अशी माझी शुभकामना आहे.

( ज.स.सहारीया )
अपर मुख्य सचिव

महाराष्ट्र शासन

**शिरीष कारले**
भा. प्र. से.
आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा



क्रीडा व युवक सेवा संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे

# शुभेच्छा

क्रीडा विषयक प्रगतीसाठी खेळांच्या पायाभूत सुविधा, क्रीडा क्षेत्रात कार्य करणारे तांत्रिक मनुष्यबळ व खेळाडूंना तंत्रशुध्द प्रशिक्षण या महत्वाच्या बाबी आहेत. राज्यातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सामोरे जाण्याकरिता त्यांना सक्षम व जागतिक स्तरावरील स्पर्धेशी समायोजन करण्याची दूरदृष्टीता विचारात घेऊन क्रीडा क्षेत्रातील संलग्न असणा-या विविध बाबींचा विचार करुन महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण-२०१२ तयार करण्यात आले आहे. या धोरणातील विविध योजना क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी हितावह ठरतील असा मला विश्वास आहे. राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य रहावे याची दूरदृष्टीता या क्रीडा धोरणामागे आहे. खेळाडू, क्रीडा संस्था व शासकीय यंत्रणा यांचा समन्वय क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे.

शासनाने लगतच्या काळात नोक-यांमधील ५ टक्के आरक्षण, खेळाडूंना थेट नियुक्ती, रोख रकमेची भरघोस पारितोषिके यामुळे नागरीक, पालक व खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे. नवीन क्रीडा धोरणात क्रीडा विद्यापीठ, राज्य क्रीडा प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन, आंतरराष्ट्रीय खेळाडूंना अर्थसहाय्य, अपघात व इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी सहाय्य, राज्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडूंना देश-विदेशात क्रीडा प्रशिक्षण देणे अशा विविध योजनांव्दारे राज्यातील खेळाडूंना सहाय्य करण्याच्या बाबी आगामी काळात परिणामकारक ठरतील.

माहिती पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**(शिरीष कारले)**

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रास्तविक | |
| १ | महाराष्ट्राचे क्रीडा धोरण – एक दृष्टिक्षेप | ५ |
| | **१. क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती** | |
| १.१ | क्रीडांगणांचे आरक्षण | ६ |
| १.२ | क्रीडा साहित्य अनुदान | |
| १.३ | राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे | ७ ते ८ |
| १.४ | तालीम, कुस्ती केंद्रांचा विकास करणे | |
| १.५ | विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल बांधकाम सुविधांचा वापर, देखभाल दुरुस्ती व वाणिज्य प्रायोजन | |
| १.६ | आमदार स्थानिक विकास निधितून क्रीडा विषयक उपक्रमासाठी सहाय्य | ९ |
| १.७ | राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना. | १० |
| १.८ | क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे | ११ ते १२ |
| | **२. आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य** | |
| २.१ | क्रीडा प्रबोधिनी | १३ |
| २.२ | अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना | १४ |
| २.३ | आदिवासी क्रीडा स्पर्धा व क्रीडा प्रबोधिनी स्थापना | १५ |
| २.४ | राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन | |
| २.५ | तालुका, जिल्हा व राज्य क्रीडा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करणे | १६ |
| | **३. खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव** | |
| ३.१ | खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव | १७ |
| ३.२ | जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविणा-या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान | १८ |
| ३.३ | क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहीत करण्यासाठी पुरस्कार व उच्च पदावरील सेवेतील संधी | |
| ३.४ | खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य. | १९ |
| ३.५ | आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शिष्यवृत्ती | |
| ३.६ | वयोवृध्द खेळाडू मानधनात वाढ | |
| ३.७ | कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ | २० |
| ३.८ | खेळाडूंसाठी गौरव, प्रोत्साहन व बक्षिसे | |
| ३.९ | आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे. | |
| ३.१० | आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क, इ. करिता आर्थिक मदत करणे | |
| ३.११ | क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू कुस्तीगीर यांना द्यावयाच्या सवलती, पुरस्कार नियमावलीत बदल. | २१ |
| ३.१२ | नागपूर येथील आमदार निवास कक्षाचे हिवाळी अधिवेशन वगळता खेळाडू निवासाकरिता वापर | २२ |
| ३.१३ | खेळाडूंना शासकीय, निमशासकीय सेवेत आरक्षण व थेट नियुक्ती | |

| | | |
|---|---|---|
| | ४. क्रीडा वातावरण निर्मिती | |
| ४.१ | स्पोर्टस नर्सरीची स्थापना | २३ |
| ४.२ | क्रीडा वाङःमय निर्मिती, क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना | |
| ४.३ | क्रीडा अभियान | २४ |
| ४.४ | शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासनांचे महत्त्व जागविणे | |
| ४.५ | स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना | |
| ४.६ | खेळाव्दारे सर्वांसाठी सुदृढता | |
| ४.७ | क्रीडा विषयक योजनांमध्ये सुधारणा | २५ |
| ४.८ | महानगरपालिका, नगरपालिका खेळ व संघ दत्तक घेणे, क्रीडा विषयक बाबीवर ५ टक्के खर्च करणे | २६ ते २७ |
| | ५. क्रीडा महोत्सवांचे आयोजन | |
| ५.१ | शाळांचा क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग | २८ |
| ५.२ | शालेय क्रीडा स्पर्धा | २९ |
| ५.३ | क्रीडा महोत्सव, क्रीडा दिन - क्रीडा सप्ताह साजरा करणे | ३० |
| ५.४ | छ.शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा, खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, कै. भाई नेरुरकर चषक खोखो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा सहाय्यक अनुदानात वाढ करणे, मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन | ३१ |
| | ६. तांत्रिक मनुष्यबळाचा विकास | |
| ६.१ | खेळांसाठी जादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करणे | ३१ |
| ६.२ | क्रीडा संहिता तयार करणे | ३२ |
| ६.३ | शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन कार्यपध्दती | |
| ६.४ | शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता | ३३ ते ३४ |
| ६.५ | क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर | |
| ६.६ | क्रीडा विभागाचे सक्षमीकरण | |
| | ७. क्रीडा विद्यापीठाची स्थापना | |
| ७.१ | महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करणे | ३५ |
| ७.२ | क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे | |
| | ८. राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन | |
| ८.१ | एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन | ३६ |
| ८.२ | महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे | ३७ |
| ८.३ | क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग | |
| ८.४ | क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण व सहाय्यक अनुदान इ.करिता क्रीडा प्रकारांची वर्गवारी करणे | ३८ |
| | ९. राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन | |
| ९.१ | महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरची स्थापना करणे | ३९ |
| ९.२ | साहसी खेळांच्या क्रीडा सुविधांची निर्मिती करणे | ४० |
| ९.३ | साहसी खेळाच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन | ४१ |
| ९.४ | साहसी क्रीडा पुरस्कार | |
| ९.५ | साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्थां व खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे | ४२ |
| ९.६ | साहसी खेळांच्या विकासाचे कार्य करणा-या संस्थांना क्रीडा साहीत्यासाठी अनुदान देणे | |
| | १०. क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना | |
| १०.१ | क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना | ४३ |
| ११ | राज्याचे क्रीडा धोरण ठरविण्यासाठी नियुक्त केलेली समिती व विशेष सहाय्य | |

# महाराष्ट्राचे क्रीडा धोरण - एक दृष्टिक्षेप

राज्याच्या क्रीडा संस्कृतीचे जतन करून या परंपरेचा वारसा चालविण्याकरीता तसेच बदलत्या काळानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा लक्षात घेवून या स्पर्धेस सामोरे जाण्याकरीता क्रीडा क्षेत्राच्या सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. सदर बाब दृष्टीपुढे ठेवून राज्य शासनाने नवीन क्रीडा धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयास अनुसरून नियुक्त करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्याचे क्रीडा धोरण तयार करण्यात आलेले आहे. क्रीडा धोरण २०१२ मध्ये समाविष्ट प्रमुख बाबी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | धोरणाची प्रमुख वैशिष्टिये | समाविष्ट बाबी |
|---|---|---|
| १ | क्रीडा विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती | • राज्यात खेळांच्या पायाभूत सविधांचा विकास.<br>• राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण<br>• खाजगी संस्थांना क्रीडा सुविधा निर्मितीकरीता भरीव आर्थिक सहाय्य.<br>• कुस्ती केंद्रांचा विकास. |
| २ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य | • खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धेची पुर्वतयारी करण्याकरीता खेळांची वर्गवारी करून अर्थसहाय्य.<br>• राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंकरीता राज्यस्तरवर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन.<br>• राज्यातील क्रीडा प्रबोधिनींचे सक्षमीकरण. |
| ३ | खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव | • आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडू व मार्गदर्शकांना रोख पारितोषिके व थेट नोकरीची संधी.<br>• खेळाडूंचा गौरव करण्याकरीता देण्यात येणाऱ्या पुरस्कार रकमेत वाढ.<br>• राज्य क्रीडा विकास निधीत वाढ. |
| ४ | क्रीडा वातावरण निर्मिती | • क्रीडा वस्तु संग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना.<br>• स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये क्रीडा समितीची स्थापना |
| ५ | क्रीडा महोत्सवांचे आयोजन | • विद्यापीठ स्पर्धांना विशेष महत्व<br>• आंतरशालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाकरीता भरीव आर्थिक सहाय्य<br>• स्पर्धेत सहभागी होणाऱ्या शाळांना अर्थसहाय्य. |
| ६ | तांत्रिक मनुष्यबळ विकास | • शाळेतील शिक्षकांसाठी प्रगत सेवांतर्गत प्रशिक्षण व्यवस्था.<br>• शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता. |
| अ.क्र. | धोरणाची प्रमुख वैशिष्टिये | समाविष्ट बाबी |
| ७ | क्रीडा विद्यापीठाची स्थापना | • राज्यातील सर्व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांचे संनियंत्रण.<br>• क्रीडा विद्यापीठांतर्गत क्रीडा व्यवस्थापनाच्या विविध अभ्यासक्रमांची सुरूवात.<br>• क्रीडा संशोधन व क्रीडा वा:डमय् निर्मितीस प्रोत्साहन. |
| ८ | राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन | • महाराष्ट्र राज्य क्रीडा परीषदेअंतर्गत विविध क्रीडा संघटना व क्रीडा संस्था यांना अर्थसहाय्य.<br>• एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन. |
| ९ | राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन | • साहसी खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरची स्थापना. |
| १० | क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना | • क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समिती |

# महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण

## १. क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती

### १.१ क्रीडांगणांचे आरक्षण



सर्वांसाठी सुदृढता, हा क्रीडा धोरणाचा गाभा असून समाजातील प्रत्येक नागरिक, आबालवृध्द हे सुदृढ असणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, औद्योगिक वसाहती आदि क्षेत्रामध्ये क्रीडांगण व मनोरंजनासाठी राखीव भूखंडाची आरक्षणे भविष्यामध्ये बदलण्यात येऊ नयेत. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/ प्राधिकरण/शासन यांनी त्यांच्या अखत्यारितील अशी मैदाने तात्काळ अद्ययावतपणे विकसित करुन आजुबाजूच्या परिसरातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, क्रीडा संस्था, वसाहती, खेळाडू, नागरिक यांना उपलब्ध करुन द्यावीत. ज्या सहकारी, खाजगी, उद्योग समुह संस्थांना शासनामार्फत जमीन उपलब्ध करुन दिली आहे, त्या सहकारी संस्थातील मोकळी जागा इतर खेळाडूंना खेळण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच क्लबच्या उपलब्ध क्रीडा सुविधांचा उपयोग करुन घेण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांकडून नाममात्र फी आकारुन दुपारी १२ ते ४ या वेळात उपलब्ध करुन देण्यात याव्यात. उपलब्ध क्रीडा सुविधांचा वापर करण्याबाबत सामंजस्य करार करताना अटी व शर्ती जाचक असू नयेत. तसेच शाळांना क्रीडांगणांची नोंदणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे सक्तीची करण्यात येईल.

### १.२ क्रीडा साहित्य अनुदान

| | |
|---|---|
| खेळाडूंना दैनंदिन सराव, क्रीडास्पर्धा, प्रशिक्षण तसेच विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण करण्यासाठी खेळांचे साहित्य अत्यावश्यक आहे. शासनामार्फत क्रीडांगण विकास योजना, गाव तेथे क्रीडांगण, व्यायामशाळा विकास या योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेतून शैक्षणिक व क्रीडा संस्थांना खेळाच्या सुविधा, व्यायामशाळेचे बांधकाम व व्यायामाचे अद्ययावत साहित्य इ.साठी अनुदान देण्यात येते. |   |

शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, चाचण्या इ.साठी पुरेसे साहित्य संस्थांमध्ये असणे अत्यावश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था यांचेकरिता क्रीडासाहित्य अनुदानाची योजना अंमलात आणण्यात येईल.

विभागीय, जिल्हा तसेच तालुका स्तरावर जेथे शासनाची क्रीडा संकुले तयार झालेली आहेत तेथे उत्कृष्ट दर्जाचे क्रीडा साहित्य व क्रीडा गणवेश सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यासाठी संकुलाच्या जागेचा वापर करण्यात येईल. ज्यामुळे संकुलाला प्रत्यक्ष भेट देणा-यांच्या संख्येतही वाढ होईल तसेच खेळाडूंना सवलतीच्या दरात क्रीडासाहित्य उपलब्ध होईल.

## १.३ राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे

महाराष्ट्र राज्याला क्रीडा संस्कृतीचा मोठा वारसा असून क्रीडा धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे तसेच क्रीडाविषयक पायाभूत सुविधा निर्माण व विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. राज्यातील व्यायामशाळा, क्रीडांगणे, जलतरण तलाव, विविध खेळांची मैदाने, इ. सुविधांची माहिती संकलित करुन जतन करणे आवश्यक आहे. क्रीडा विभागामार्फत सर्वेक्षणाची विशेष मोहिम हाती घेण्यात येईल. विशेष अनुदान देऊन क्रीडा सुविधा सर्वेक्षणाची माहिती संगणकीकृत करण्यात येईल.

## १.४ तालीम, कुस्ती केंद्रांचा विकास करणे

ग्रामीण व शहरी भागात कुस्ती खेळाची विशेष आवड आहे. हा खेळ प्रामुख्याने माती व गादी विभागात खेळला जातो. मातीच्या आखाडा/तालीम यांची विशेष ओळख सर्वत्र आहे. कुस्तीच्या तंत्रात झालेले बदल लक्षात घेऊन आखाडा/तालमीचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. यासाठी खालील उपाय योजना करण्यात येतील.

- मातीचे आखाड्यांचे बांधकाम, तालमींच्या दुरुस्ती व मॅटस् घेण्याकरिता क्रीडा मंडळे, कुस्ती कलेच्या विकासाचे कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना रु. ७.०० लक्ष अर्थ सहाय्य देण्यात येईल.





- तालीम/आखाड्याच्या ठिकाणी आधुनिक प्रशिक्षणासाठी उपकरणे, मसाज सेंटर, सोना स्टीम बाथ, स्मार्ट फुल, जॅकुझी इत्यादी सुविधा विकसित करण्यासाठी अर्थ सहाय्य देण्यात येईल.
- आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू लगतच्या तीन वर्षात निर्माण करणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

## १.५ विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल बांधकाम सुविधांचा वापर, देखभाल दुरुस्ती व वाणिज्य प्रायोजन

राज्यात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्मितीसाठी विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत विभागीय क्रीडा संकुल रु. २४ कोटी, जिल्हा क्रीडा संकुल रु. ८ कोटी, तालुका क्रीडा संकुल रु. १ कोटी बांधकाम अनुदान देण्यात येते. संकुलाचे बांधकाम विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. बांधकामाचे वाढते दर व निश्चित करण्यात आलेली अनुदान मर्यादा या बाबी पहाता संकुलांना पूर्णतः अनुदान एकाच वेळी देणे आवश्यक आहे. हाती घेतलेला प्रकल्प प्रथमतः पूर्णत्वास नेण्यासाठी बांधकामाचे उर्वरित अनुदान समित्यांना तत्परतेने उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच बांधकाम दर वाढत असल्याने अनुदान दराचे पुर्नमुल्यांकन शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून दोन वर्षांनी करण्यात येईल.

**<u>सुविधांचा वापर :-</u>**

संकुलामधील क्रीडा सुविधा खेळाडूंसाठी दैनंदिन सराव, प्रशिक्षण स्पर्धा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. या सुविधा खेळाडूंना माफक दरात मिळण्यासाठी दर निश्चित करावेत. क्रीडा उपक्रमाव्यतिरिक्त अन्य बाबीसाठी भाडयाचे वेगळे दर निश्चित करण्यात येतील.

खाजगी प्रायोजकांनी संकुलामध्ये क्रीडा अकादमी स्थापन करण्यासाठी पुढे यावेत यासाठी प्रतिष्ठित समूहांना पुढाकार घेण्याबाबत उद्युक्त करणे आवश्यक आहे. अशा प्रायोजकांनी त्यांचे प्रशिक्षक, क्रीडा साहित्य, सुविधा वापरांचे दर, खेळाडू निवास, इत्यादी बाबत संकुल समित्यांशी करार करावेत. स्थानिक खेळाडूंना यासाठी विशेष आरक्षण ठेवण्यात येईल. यामुळे संकुलाचा वापर, उत्पन्नाची साधने तसेच तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन संकुलामध्ये मिळण्याची सुविधा उपलब्ध होतील.

**<u>देखभाल-दुरुस्ती</u>** :-

शासकीय अनुदानातून क्रीडा संकुल निर्मितीसाठी शासन अनुदान देते. संकुल समित्यांना देखभाल दुरुस्ती व इतर आवर्ती खर्च भागविण्यासाठी विभागीय संकुल रुपये १५.०० लाख, जिल्हा क्रीडा संकुल रु.१०.०० लाख व तालुका क्रीडा संकुल रु.३.०० लाख (वेतन व भत्त्यासह) देण्याची सध्याची तरतूद आहे.

वीज, पाणीपट्टी, नगरपालिका व महानगरपालिका यांचे कर, संकुलाची स्वच्छता व सुरक्षा, देखभाल-दुरुस्ती इत्यादीवर होणारा दैनंदिन खर्च करणे क्रमप्राप्त आहे. शासनाने बांधकामासाठी गुंतविलेल्या आर्थिक तरतुदीचा विचार करता सदर सुविधा सुस्थितीत दीर्घायुषी जतन होण्यासाठी संकुलाचा वापर, देखभाल-दुरुस्ती इ. दैनंदिन खर्चासाठी खालील प्रमाणे वाढीव अनुदान प्रतिवर्षी देण्यात येईल.

| | |
|---|---|
| विभागीय क्रीडा संकुल | रु.२५.०० लाख |
| जिल्हा क्रीडा संकुल | रु.१५.०० लाख |
| तालुका क्रीडा संकुल | रु.३.०० लाख |

**<u>वाणिज्यिक प्रयोजनातून सुविधांचा विकास</u>** :-

वाणिज्यिक प्रयोजनातून संकुलाची निर्मिती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे शासनाने निर्गमित केली आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा. (BOT) व पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) इत्यादी माध्यमातून संकुलासाठी खाजगी गुंतवणूकदार मिळवून आधुनिक संकुले उभी करण्यात येतील.

संकुलामध्ये क्रीडा सुविधा विकसित करण्यात येत आहे. त्याशिवाय संकुल क्षेत्रात उपहार गृहे, क्लब हाऊस इत्यादी सुविधा विकसित करण्यात येतील. खेळाडूंना माफक दरात संकुलातील सुविधा उपलब्ध होण्यासाठी क्रीडा उपक्रमाव्यतिरिक्त बाबींसाठी संकुले भाडयाने देताना वाढीव दर आकारण्यात येईल.





## • बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करणे

बृहन्मुंबई शहराकरीता क्रीडा सुविधा निर्मातीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतील.

- मुंबईमध्ये बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करून त्या अंतर्गत वार्डनिहाय क्रीडा संकुले तसेच मुंबई शहर, उपनगर व नवी मुंबई या जिल्ह्यांसाठी जिल्हा क्रीडा संकुले त्याची उभारणी करण्यात येतील.
- मुंबई येथे विकसीत करण्यात येणाऱ्या क्रीडा सुविधांमध्ये विविध खेळांच्या क्रीडा अकादमी कार्यान्वित करण्यात येतील. खाजगी प्रायोजकांचे सहकार्य घेवून दर्जेदार कामगीरी करणाऱ्या खेळाडूंना नित्य प्रशिक्षण देण्यात येईल.
- कांदीवली येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या जागेवर आंतरराष्ट्रीय स्पर्धा संयोजनाच्या दृष्टीने विभागीय क्रीडा संकुलाची निर्मिती करण्यात येईल. या सुविधा विकसित करतांना बांधा, वापरा व हस्तांतरीत करा. (BOT) व पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) माध्यमातून सुविधा निर्मिती करण्यात येतील.
- बृहन्मुंबई प्राधिकरण स्थापना करून त्यांच्या कार्यकक्षेमध्ये मुंबई येथील मैदानाचा सुयोग्य वापर, क्रीडा अकादमींचे कार्यान्वय, संकुलांची बांधकामे, क्रीडांगणावरील अतिक्रमण हटवणे, क्रीडा विकासासाठी सहाय्यभूत असणाऱ्या बाबीं अंतर्भूत करण्यात येतील.
- मुंबई येथील क्रीडांगणाचा सुयोग्य वापर करण्यासाठी उदा.ब्रेबॉन स्टेडियम, पुरंदरे स्टेडियम इ.जिमखाने वापरासाठी क्रीडा प्राधिकरणाचे सनियंत्रण राहील.

## • राज्य क्रीडा विकास समितीची पूर्नरचना.

महाराष्ट्र स्पोर्टस इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत योजनाबध्द क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी व त्याचा आढावा घेण्यासाठी राज्य क्रीडा विकास समितीची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. या समितीची व्यापकता पाहता त्यांची पुनर्रचना करण्यात येईल. यामध्ये मा.मंत्री, (क्रीडा) - अध्यक्ष, मा.राज्यमंत्री, - उपाध्यक्ष, मा.प्रधान सचिव- नियोजन, वित्त व क्रीडा - सदस्य. तसेच संचालक क्रीडा हे सदस्य सचिव असतील. या समितीला राज्य क्रीडा विकास समितीप्रमाणेच कार्यकक्षा व अधिकार राहतील.

## १.६ आमदार स्थानिक विकास निधीतून क्रीडा विषयक उपक्रमासाठी आर्थिक सहाय्य -

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत क्रीडा विषयक उपक्रम व बाबींमध्ये सध्याचे तरतूदी खेरीज खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येतील.

- व्यायामशाळा बांधकाम व साहित्य तसेच क्रीडांगण विकास इ. बाबीसाठी मर्यादा रु. ७.०० लक्ष करण्यात येईल.
- खेळाडूंना वैयक्तिक क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी रू.१.०० लाखपर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. आंतरराष्ट्रीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना याचा लाभ देण्यात येईल.
- खेळाडूंना इजा,दुखापत,वैद्यकीय उपचारासाठी रू.२.०० लाख कमाल मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येईल.

आमदार स्थानिक विकास निधीतून क्रीडास्पर्धासाठी खालील मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात येईल.

| अ.क्र | स्पर्धा | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १. | स्थानिक क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा मंडळ, क्रीडा संस्था यांनी अधिकृत संघटनेच्या मान्यतेने आयोजित केल्या जाणा-या निमंत्रित जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धा. | १.०० |
| २. | जिल्हा क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा) | २.०० |
| ३. | राज्य क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकी स्पर्धा) | ४.०० |
| ४. | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा) | ५.०० |
| ५. | आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा) | १०.०० |

## १.७ राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना -

### अ. राज्य क्रीडा विकास निधीची स्थापना -

राज्य व जिल्हा स्तरावर क्रीडा विकासाचे उपक्रम परिणामकारकरित्या राबविणे, राज्यातील प्रतिभावान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाची कामगिरी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य क्रीडा विकास निधी उभाण्याबाबत दिनांक ३ सप्टेबर २००३ शासन निर्णयान्वये निर्णय घेतलेला आहे. राज्य क्रीडा विकास निधीचे उत्पन्नाचे स्त्रोत राज्य शासनाकडून प्रतिवर्षी ५०.०० लक्ष, अश्वशर्यतीचे एका दिवसाचे उत्पन्न(मुंबई शर्यत), विविध औद्योगिक प्रतिष्ठाने वा वाणिज्य प्रतिष्ठानातर्फे देण्यात येणा-या देणग्या, जिल्ह्यामधुन जिल्हापरिषद , महानगरपालिका व नगरपालिकेमार्फत जिल्हा विकास निधिमध्ये जमा होणा-या रकमेपैकी ४० टक्के रक्कम, जिल्हा विकास निधीमध्ये शैक्षणिक संस्थाकडून जमा होणा-या निधीपैकी ४० टक्के रक्कम व प्रदर्शनीय सामने, सांस्कृतिक कार्यक्रम इ. उपक्रमामधुन जमा होणारा निधी अशी आहेत. खालील उपाय योजनेद्वारे राज्य क्रीडा विकास निधी सक्षम करण्यात येईल.





- राज्य शासनाकडून प्रतिवर्षी रुपये ३.०० कोटी अनुदान.
- विशेष क्रीडा लॉटरीचे प्रकाशन करुन जमा होणारे उत्पन्न.
- औद्यगिक व वाणिज्य प्रतिष्ठानाकडून देणग्या स्विकारण्यात येतील व अशा देणगीदारांना आयकरामध्ये विशेष सवलत देण्यात येतील.
- मुंबई येथील शासनाच्या नियंत्रणा खालील क्रीडांगणांच्या भाड्यापोटी जमा होणारी रक्कम.
- खाजगी शिक्षण संस्था, नोंदणीकृत संस्था यांना शासनाच्या मालकीच्या जमीनी भाडेपट्टा किंवा मालकीने दिली असल्यास सदर संस्थेद्वारे उत्पन्नाचे स्त्रोत मिळविण्यासाठी क्रीडांगणावर आयोजित उपक्रमाच्या (उदा. व्यापारी प्रदर्शन, लग्न समारंभ, गरबा इत्यादी) भाड्यापोटी मिळणा-या उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम.

### ब. जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना-

खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्याकरीता विविध उपक्रम, प्रशिक्षण शिबिरे, साहित्य तसेच वेळोवेळी उद्भवणा-या अडीअडचणीकरीता तात्काळ आर्थिक सहाय्य करणे आवश्यक आहे. राज्य क्रीडा विकास निधीच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी क्रीडा विकास निधी स्थापन करण्यात येईल. या निधीसाठी शासनाकडून रु. ५.०० लक्ष इतक्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. औद्यगिक व वाणिज्य प्रतिष्ठानाकडून देणग्या स्विकारण्यात येतील व अशा देणगीदारांना करांमध्ये विशेष सवलत देण्यात येतील.

## १.८ क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे -

खेळाडू तयार होण्यासाठी अदयावत क्रीडा सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. केंद्र शासनामार्फत या सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदान देण्याची योजना सन २००५-०६ या वर्षापासून बंद करण्यात आलेली आहे. नियोजन आयोगाने क्रीडा सुविधा निर्मितीमध्ये राज्यशासनांनी पुढाकार घ्यावा असे केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयास सुचित केलेले आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाकडून नविन प्रकल्पांना अनुदान देण्यात येत नाही. शैक्षणिक संस्था, कटक मंडळे, सेवाभावी संस्था, क्रीडा संस्था, नगर परिषदा, महानगर पालिका, ग्राम पंचायती यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अर्थ सहाय्य केद्रशासनाच्या पूर्वीच्या योजनेत देण्यात येत होते. याच धर्तीवर राज्य शासनमार्फत क्रीडा सुविधा निर्मीती योजना आखण्यात येईल यामध्ये राज्य शासन व संस्था यांचा ७५:२५ या प्रमाणात हिस्सा राहिल.त्यामुळे क्रीडा संस्कृती जोपासण्यास मदत होईल. खालील बाबीसाठी नवीन योजनेत अनुदान देण्यात येईल.

| अ.क्र | प्रकल्पाचा प्रकार | अपेक्षित अंदाजित खर्च | राज्यशासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | **क्रीडांगण विकसित करणे** | | | |
| | फुटबॉल/ क्रिकेट/ हॉकी इ.खेळाची प्रमाणित आकाराची मैदाने | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे आठ लेन्सच्या धावनपथासह ग्रास/ सिंडर ट्रॅक इ. | २०.०० | १५.०० | ५.०० |
| | प्रमाणित आकाराचे सिमेंट क्रॉंक्रिट बास्केटबॉल कोर्ट (पोस्ट व बोर्डसह) | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे ( मुरुम ) टेनिस कोर्ट | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे व्हॉलीबॉल मैदाने | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| २ | **बंदिस्त प्रेक्षागह** | | | |
| | ४० X २५ X १२.५ मी आकारापेक्षा कमी नसलेले (प-लोअरींगसह) चेंजींग रुम्स व स्वच्छतागृहे व प्रसाधनगृहासह | १२०.०० | ९०.०० | ३०.०० |
| | ३५ X १९ X १२.५मी आकारापेक्षा कमी नसलेले (प-लोअरींगसह) | ९०.०० | ६७.५० | २२.५० |
| | १७ X १७ X ७ मी. आकारापेक्षा कमी नसलेले (फलोअरींगसह) | ४०.०० | ३०.०० | १०.०० |
| ३ | **क्रीडा सुविधा** | | | |
| | १८० X १०० मी मैदान आणि आठ लेन्सच्या धावनपथ , चेंजिंग रुम, प्रसाधनगृह इ. | ३६.०० | २७.०० | ९.०० |
| | १८० X १००मी. आकारापेक्षा कमी नसलेले मैदान ग्रास/ सिंडर सहा लेनचा धावनपथ, चेंजिंग रुम, प्रसाधनगृह इ. | ३०.०० | २२.५० | ७.५० |
| | जलक्रीडा सुविधा, साहसी खेळांची सुविधा व साहित्य जलतरण तलावा व्यतिरिक्त (बोट हाऊस, जे.टी.ई व क्लाईंबिंग वॉल,) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | स्केटींग रिंक (आऊट डोअर) सिमेंट कॉंक्रीट फलोअरींग<br>आकार ४० X २० मी. | १०.०० | ७.५० | २.५० |
| | वेलोड्रम ( प्रमाणित आकाराचा ) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | शुटींग रेंज | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | ॲस्ट्रॉटर्फ हॉकी क्रीडांगण | ७५.०० | ५६.२५ | १८.७५ |
| | लॉन टेनिस | २०.०० | १५.०० | ५.०० |



## ब. क्रीडा साहित्यासाठी अनुदान .

खेळांडूना नित्य नियमांने सराव, क्रीडा विकासाचे कार्य करणा-या संस्थांना स्पर्धा, प्रशिक्षण इत्यादी करिता क्रीडा साहित्याची आवश्यकता आहे. खेळ व अनुषंगिक साहित्य, प्रशिक्षण उपकरणे इत्यादीसाठी संस्थाना सहाय्य केल्यास खेळाडूंच्या कामगिरीचा दर्जा उंचावण्यास सहाय्य होईल. संस्थाकडे स्थावर उत्पन्नाची साधने उपलब्ध नाहीत ही बाब विचारात घेता, खालील क्रीडा प्रकारांचे क्रीडा साहित्य राज्य शासन व संस्था यांना ७५:२५ या हिश्यात देण्यात येईल.

**क्रीडा साहित्यासाठी अनुदान मर्यादा**

(रुपये लाखात)

| अ.क्र | क्रीडा प्रकार | क्रीडा साहित्य | अनुदान मर्यादा | राज्यशासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **ॲथलेटिक्स** | थाळी, गोळा ,भाला, ॲथलेटिक्स मार्किंग कोन्स, स्टार्टींग ब्लॉक्स, रिले बॅटन्स, हर्डल्स, हायजंम्प व पोलव्हॉल्ट क्रॉसबार, लांब , उंचउडी व पोलव्हॉल्ट टेक ऑफ बोर्ड, हायजंप व पोलव्हॉल्ट पिट, गोळा टो बोर्ड, हर्डल्स, स्टारटर रोर्स्टम, स्पाईक इ. | १०.०० | ७.५० | २.५० |
| २ | **फूटबॉल** | फूटबॉल,गोलकिपर ग्लोव्हज,कोन,फूटबॉल नेट, किकिंग बोर्ड, गोलपोस्ट , कॉर्नर फ्लॅग, रेफरी फ्लॅग, | ४.०० | ३.०० | १.०० |
| ३ | **हॉकी** | हॉकी गोलकिपर कीट ,हॅण्ड ग्लोव्हज, हॉकी टर्फ बॉल, गोल पोस्ट सेट, प्रॅक्टिस नेट, स्टीक केस, स्टीक यु ब्लेड कार्बन, फायबर ग्लास, हिटींग बोर्ड, कोन,शिनगार्डस | ४.०० | ३.०० | १.०० |
| ४ | **टेनिस** | टेनिस बॉल,टेनिस नेट, लॉनटेनिस पोल ,(स्लिवस सहित) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ५ | **बॅडमिंटन** | बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन पोल, | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ६ | **वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टींग** | रबर कोटेड बारबेल सेट, वेटलिफ्टिंग बेल्ट, वेटलिफ्टिंग प्लॅटफॉर्म, | ४.०० | ३.०० | १.०० |
| ७ | **कुस्ती** | कुस्ती मॅट (१२ X १२ मी.सेट सिंथॅटिक कव्हरसह ) | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| ८ | **व्हॉलिबॉल** | व्हॉलिबॉल, व्हॉलिबॉल नेट, व्हॉलिबॉल पोल, ॲटीना फायबर ग्लास, | ०.७५ | ०.५६ | ०.१९ |
| ९ | **खो खो** | पोल (टीकवूड) १० नग | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |
| १० | **बॉक्सींग** | ग्लोव्हज टेन ऑन्स रेड ब्ल्यू , पंचींग पॅड, पंचींग बॅग, हेड गियर रेड-ब्ल्यू, पंचींग ग्लोव्हज ,बॉक्सिंग रींग, | ०.७५ | ०.५६ | ०.१९ |
| ११ | **रस्सीखेच** | १.५“ रस्सी | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | **हॅण्डबॉल** | हॅण्डबॉल, गोलपोस्ट, नेट | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| १३ | **जलतरण** | पाम पुलर,किक बोर्ड,पुल बॉय, लाईफ जॅकेट, बॅरल फ्लोट, आर्म फ्लोट लेन, लाईफ बॉय, फ्लोटलेन, डॉयव्हिंग बोर्ड, डॉयव्हिंग बोर्ड स्टॅन्ड | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| १४ | **जिम्नॅस्टिक्स** | बॅलसिंग बिम,अनइव्हन बार, हॉरिझॉन्टल बार,पॉमेल हॉर्स, पॅरलल बार, रोमन रिंग, व्हॉल्टिंग टेबल, जिम्नॅस्टिक्स बेंचेस, बीट बोर्ड -फाइव्ह स्प्रिंग्स, थ्रीज स्प्रिंग्स, वॉल बार्स फॉर टू सेक्शन, रोमन रिंग्ज, स्पॉटिंग बेल्ट, फ्लोअर प्लेट, मुशरुम हॉर्स, स्पेअर पॉमेल, ट्रॅम्पोलिन, फलोअर एक्सरसाईज मॅट, रिदमिक साहित्य. (रोप.,बॉल,रिबन,क्लब) | १५.०० | ११.२५ | ३.७५ |
| १५ | **कबड्डी** | सिंथेटिक मॅट्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| १६ | **बास्केटबॉल** | बास्केटबॉल,नेट, पोल | ४.०० | ३.०० | १.०० |
| १७ | **टेबलटेनिस** | टेबल, रोबो (multy program) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| १८ | **ज्युदो, तायक्वादो, कराटे** | मॅट्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| १९ | **मल्लखांब** | पोल, रोप | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| २० | **शुटींग** | ईलेक्ट्रॉनिक पुली, टारगेट, एअर रायफल, एअर पिस्टल, लाईटस्टॅण्ड, रायफलस्टॅण्ड,पॅलेट | १०.०० | ७.५० | २.५० |
| २१ | **तिरंदाजी** | तिरंदाजी खेळासाठी पुरक साहीत्य | २.०० | १.५० | ०.५० |

वरील नमूद क्रीडा प्रकार उदाहरणार्थ दिलेले असून कालानुरुप बदल, उपाय योजना, क्रीडा प्रकार, साहित्य व अनुदान मर्यादा यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

## २. आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य

### २.१ क्रीडा प्रबोधिनी

राज्य शासनामार्फत विविध जिल्हयांत ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. यामध्ये एकुण ७५० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. प्रचलित पध्दतीत निवड प्रक्रियेद्वारे या प्रबोधिनीत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. परंतु सदर प्रबोधिनीत संपूर्ण क्षमतेमध्ये विद्यार्थी सहभागी झाल्याचे दिसत नाही. या योजनेची व्यापक प्रसिध्दी तसेच प्रचलित निवड पध्दत शिथिल करणे अत्यावश्यक आहे.यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतील. प्रबोधिनीच्या प्राचार्य पदासाठी क्रीडा क्षेत्रातील व्यक्तीची नेमणूक करण्यात येईल.





- बॅटरी ऑफ टेस्ट (निवड चाचण्या) पध्दतीचे पुर्नमूल्यांकन करण्यासाठी तज्ञांची समिती नियुक्त करण्यात येईल. नवीन क्रीडा धोरण समितीने अहवाल सादर केल्यानंतर पुढील तीन महिन्यात तज्ञ समिती व्दारे अहवाल शासनास सादर करण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनीत थेट प्रवेश देताना राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व केलेल्या, खेळाडूंचा विचार होईल. तसेच राज्यस्तरावरील स्पर्धेत १४ व १७ वर्षे वयोगटात प्रथम तीन क्रमांक संपादन करणा-या खेळाडूंना सरळ प्रवेश देण्यात येईल.
- खेळाडूचा प्रवेश रद्द करण्याबाबत वयोमर्यादा निश्चित करत असताना १४ ते २० वर्षे या कालावधीत मिळविलेले प्राविण्य व भविष्यात होणारी प्रगती याबाबत विचार करुन प्रवेश रद्द करण्यात येईल.

- क्रीडा प्रबोधिनीमध्ये मानधनावर नियुक्त केलेल्या क्रीडा मार्गदर्शकांना मासिक रु.२५०००/- इतके मानधन देण्यात येईल. पाच वर्षे त्याच्या कामाचे मूल्यमापन करुन मुदतवाढ देण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीची अपेक्षा करताना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण तज्ज्ञांमार्फत देणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावरील नामांकित विदेशी प्रशिक्षकांची नियुक्ती केल्याने खेळाडूंच्या कामगिरीचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. याकरिता मार्गदर्शकांना आकर्षक मानधन, ३० ते ६० दिवसांपर्यंतचे प्रगत प्रशिक्षण इ.बाबींचा विचार करण्यात येईल.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना प्रतिमाह शिष्यवृत्ती देण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनी / क्रीडापीठ, पुणे येथील संकुलात नियमित आंतरराष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.
- प्रत्येक क्रीडा विभागात क्रीडा प्रबोधिनी निर्माण करणे.

## २.२ अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना

खेळाडूंना स्थानिक स्तरावर खेळाच्या उत्तम सुविधा व तांत्रिक प्रशिक्षण नियमित दिल्यास खेळाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. पालक आपल्या पाल्यांना घरापासून लांब ठेवण्यास तयार नसतात, यासाठी स्थानिक स्तरावर अनिवासी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात येईल. अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरु करण्याबाबत व विद्यार्थ्यांना क्रीडा प्रबोधिनीमध्ये अनिवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यात येईल.



- स्थानिक स्तरावरील खाजगी पंजीकृत मान्यता प्राप्त क्रीडा विकासाचे कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांना अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापन करण्यास मान्यता देण्यात येईल. अशी मान्यता देताना या संस्थेकडे मागील तीन ते पाच वर्षे क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले असणे आवश्यक आहे. संस्थेने ज्या खेळाच्या  क्रीडा अकादमीची मागणी केली आहे त्या खेळासाठी आवश्यक असणा-या सोयी-सुविधा जसे प्रशिक्षण सुविधा, तज्ञ प्रशिक्षक, क्रीडा साधनसामुग्री असणे आवश्यक आहे.
- अनिवासी प्रबोधिनीतील खेळाडूंना रूपये १०० दैनिक आहार भत्ता, प्रशिक्षकासाठी किमान रूपये १५,००० मासिक मानधन तसेच सहाय्यकास रु.५०००/- मासिक मानधन देण्यात येईल.
- अनिवासी क्रीडा प्रबोधिनीचा व्यवस्थापन खर्च, विद्युत खर्च, क्रीडांगण देखभाल दुरुस्ती इत्यादीसाठी रु.५०००/- दरमहा दिला जाईल.
- क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना खेळाचा गणवेष व क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धेचा प्रवास खर्च, दैनिक भत्ता, निवास व भोजन यासाठी अनुज्ञेय देय रक्कम अनिवासी क्रीडा प्रबोधिनींना देण्यात येईल.
- अनिवासी क्रीडा प्रबोधिनी मंजूर केलेल्या संस्थांनी अनुदान विनियोग, योग्य कार्यन्वयन

इत्यादीं न केल्यास अशा संस्थांना एक महिना पूर्व नोटीस देऊन मान्यता रद्द केली जाईल.

शासनाने विकसीत केलेल्या तालुका, जिल्हा, विभागीय क्रीडा संकुलामध्ये संकुल समितीद्वारे अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरु करणे करण्यात येईल तसेच महानगरपालिका क्षेत्रामध्ये लोकसंख्येच्या आधारे अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरु करण्यात येतील.

## २.३ आदिवासी क्रीडा स्पर्धा व क्रीडा प्रबोधिनी स्थापना

राज्यात आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थांना क्रीडा व शारीरिक शिक्षणासाठी बी.पी.एड. पदवी धारक शिक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे.शारीरिक शिक्षणाचे तांत्रिक ज्ञान /माहीती देणे साठी अहर्ताप्राप्त शारीरिक शिक्षक असणे आवश्यक आहे.

या खेळाडूंच्या जिल्हा व राज्यस्तरापर्यंत स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीचा दर्जा उंचावण्यासाठी तज्ञ मार्गदर्शकांच्या नियंत्रणात दैनंदिन अद्ययावत प्रशिक्षणासाठी क्रीडा प्रबोधिनीची स्थापन करण्यात येईल.

## २.४ राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन

खेळाडूंच्या क्रीडाविषयक कामगिरीमुळे देशाच्या व राज्याच्या नावलौकीकात भर पडत आहे. खेळाडू घडविण्यासाठी खेळाच्या पायाभूत सुविधा, क्रीडा मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, सराव व प्रशिक्षणासाठी पुरेसे साहित्य, प्रशिक्षणाचा कृती आराखडा, खेळातील कौशल्यांवर प्रभुत्व येण्यासाठी सराव, नियमित प्रशिक्षण, स्पर्धा, खेळाडूंच्या सकारात्मक मानसिकतेसाठी मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आहार तज्ञ, मसाजिस्ट, दुखापतीवर इलाजासाठी फिजीओथेरपीस्ट इ.बाबींचे मार्गदर्शन खेळाडूंना पुरविणॆ आवश्यक आहे.

जागतिक नामांकित स्पर्धामध्ये नवनवीन उच्चांक प्रस्थापित होतात तसेच विविध तंत्रांच्या आधुनिक उपकरणांचा वापर करुन खेळाडूंची कामगिरी उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. राज्यातील उद्योन्मुख खेळाडूंसाठी दर्जेदार नामांकित प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, समतोल आहार तसेच नियमित प्रशिक्षण या गोष्टींवर लक्ष केंद्रीत करुन प्रशिक्षणाचा कृती कार्यक्रम हाती घेण्यात येईल.





- तज्ञ क्रीडा प्रशिक्षकांच्या नियंत्रणाखाली खेळाडूंचा दर्जा वाढवणे. देशी, विदेशी प्रशिक्षकांच्या करार पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेणे. मानधनाचे दर, प्रशिक्षकांचा दर्जा व त्यांची मागणी इ.बाबी विचार करण्यात येईल.
- खेळाडूंसाठी राज्यस्तरावर तीस दिवसांचे वर्षातून दोनवेळा प्रशिक्षणाचे आयोजन.
- शिबीरासाठी खेळाडूंची निवड अंतिम करण्यासाठी पाच जणांची समिती नियुक्त करण्यात येईल. यामध्ये संचालक, क्रीडा व युवक सेवा, संबंधित एकविध खेळ संघटनेचे सचिव अथवा त्यांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचा प्रतिनिधी, संबंधित खेळाचा अर्जुन/शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त खेळाडू, संबंधित खेळांचे मार्गदर्शक राहील.
- प्रशिक्षणार्थी खेळाडूंची निवड करताना राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडू, राज्यस्तर स्पर्धेतील प्राविण्यधारक तसेच उद्योन्मुख खेळाडूंना संधी देण्यात येईल.
- राज्यातील विविध खेळांच्या एकविध संघटनांच्या खुल्या गटातील पुरुष/महिला खेळाडू, तसेच भारतीय शालेय खेळ महासंघामध्ये १७ व १९ वर्षे वयोगटातील राष्ट्रीय स्पर्धेतील

सहभागी खेळाडू इ.चा समावेश शिबीरामध्ये केला जाईल.

- प्रशिक्षण शिबीरादरम्यान खेळाडूंचा आहार रू.२५०/- , निवास रू.२५०/- व पूरक आहारासाठी रू.५०/- याप्रमाणे प्रत्येक खेळाडूवर खर्च करण्यात यावेत. तसेच प्रवासाची रक्कम देण्यात येईल.
- खेळाडूंना क्रीडा गणवेश व ट्रॅकसूट इ.साठी प्रति खेळाडू रू.२०००/- देण्यात यंईल.
- प्रशिक्षणादरम्यान क्रीडा साहित्य व प्रशिक्षण उपकरणासाठी रू.७५,०००/- तसेच क्रीडांगण देखभाल, मैदान सेवक व सादील खर्च इ.साठी रू.२५,०००/- देण्यात यंईल.
- खालील खेळांची प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्यात येईल.इतर क्रीडा प्रकाराबाबत भविष्यात विचार केला जाईल.

**प्रशिक्षणासाठी निवडलेले प्रथम टप्प्यातील क्रीडा प्रकार. -** १.ॲथलेटिक्स २. जलतरण ३. कबड्डी ४. आर्चरी, ५.सेलिंग ६.रोईंग ७.खो-खो ८. हॉकी, ९.जिम्नॅस्टिक्स (रिदॅमिकसह)१०. शूटींग ११. बॅडमिंटन १२. कुस्ती १३. टेबलटेनिस, १४.लॉनटेनिस१५. व्हॉलीबॉल या खेळांसाठी प्राधान्याने शासनाने तरतूद उपलब्ध करुन द्यावी.



## २.५ तालुका, जिल्हा व राज्य क्रीडा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करणे .

अ) जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र - जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करुन खेळाडूंना नियमित प्रशिक्षण देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. तालुका स्तरावर नियमित प्रशिक्षणासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करावीत. त्यासाठी पुरेसे अर्थसहाय्य देण्यात यंईल.

- जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केद्रांतर्गत शिबीरांदरम्यान दैनंदिन प्रशिक्षणासाठी येणा-या प्रत्येक शिबीरार्थीना अल्पोपहारासाठी प्रतिदिन रु.५०/-, क्रीडा साहीत्य, प्रशिक्षक मानधन,मैदान सेवक,सादील खर्च इ.साठी रु.१.०० लक्ष देण्यात यंईल.
- क्रीडा स्पर्धा, खेळाडू गणवेश, दैनंदिन अल्पोपहार, क्रीडा साहित्य, निवास खर्च, प्रवास इ.बाबीवरील खर्च अनुज्ञेय ठरवून आर्थिक तरतूद करण्यात रु.५.०० लक्ष यंईल.
- तालुका व जिल्हा क्रीडा संकुलातील सुविधा प्राधान्याने या उपक्रमासाठी वापरण्यात यंईल.
- जिल्हयातील क्रीडा शिक्षक, मार्गदर्शक तसेच क्रीडा संस्थांमधील प्रशिक्षकांसाठी चर्चासत्र,परिसंवाद,कार्यशाळा तसेच उजळणी वर्गाचे नियमित आयोजन करण्यात यंईल.
- जिल्हास्तरावर विविध खेळांचे नियमित प्रशिक्षण व वर्षातून दोन वेळा किमान २० दिवसांचे शिबीरांचे आयोजन केले जाईल.
- ब) विभागीय क्रीडा संकुलांमध्ये दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण झालेल्या आहेत. या सुविधांचा वापर दैनंदिन प्रशिक्षण तसेच राज्यस्तरीय क्रीडा प्रशिक्षणासाठी नियमित करण्यात यावा. विभागीय संकुलात आयोजित करण्यात येणा-या क्रीडा प्रशिक्षणासाठी जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राप्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

# ३. खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव

## ३.१ खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव

**राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय खेळाडूंसाठी विशेष गुण सवलत .** विद्यार्थ्यींच्या शैक्षणिक व क्रीडा कामगिरी कडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारे दहावी व बारावी इयत्तेतील शालेय खेळाडू विद्यार्थ्यांना २५ ज्यादा गुण देण्याबाबत केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.४ जून २००७ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. शासन व संघटनाद्वारे आयोजित करण्यात येणा-या राज्य, राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना २५ गुण देण्यात येतात.

क्रीडा विभागामार्फत तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय या स्तरावर स्पर्धा घेण्यात येतात तर संघटनामार्फत जिल्हा व थेट राज्यस्पर्धा घेण्यात येतात. संघटनांनी दाखल केलेल्या खेळाडूंच्या याद्यांमध्ये काही जिल्हयांचा संपूर्ण संघच दहावी किंवा बारावीच्या विद्यार्थ्यांचा असल्याचे आढळून आले आहे. यावरुन असे निष्पन्न होते की, खेळाशी, खेळभावनेशी तसेच स्पर्धेतील संघाच्या कामगिरीशी तडजोड करुन केवळ क्रीडा सवलत गुण घेण्यासाठी संघाची निवड केली जात आहे. यामध्ये मोठा गैरप्रकार झाल्याची उदाहरणे देखील पुढे आली आहेत. यासर्व प्रकारांवर एकंदरीतच २५ क्रीडा सवलत गुण विद्यार्थ्यांना देण्यामागचा उद्देश सफल होत नसल्याचे आढळून आले आहे.

एकविध खेळ मान्यता प्राप्त संघटनांद्वारे आयोजित करण्यात येणा-या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होणा-या विद्यार्थ्यांनाच दहा गुण देण्यात यावे. तसचे सांघिक/वैयक्तिक खेळात प्रथम तीन क्रमांकाच्या खेळाडूंना २५ गुण व चार ते आठ क्रमांकात असणा-या संघातील खेळाडूंना २० गुण देण्यात यावे व राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडू २५ गुणांची क्रीडा गुणांची सवलत देण्यात यंईल.

शालेय राज्यस्तरीय स्पर्धेतील सहभागी होणा-या खेळाडूंना २० क्रीडा गुण, प्राविण्यधारक इ. प्रथम तीन क्रमांकाच्या संघातील खेळाडूंना तसेच राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडूना २५ क्रीडा गुणांची सवलत देण्यात यंईल. तसेच विभागस्तरावर आयोजित करण्यात येणा-या स्पर्धामध्ये सहभागी होणा-या खेळाडूंना १० गूण देण्यात यंतील.

दहावी-बारावीप्रमाणे १ ली ते ९ वी पर्यन्त आणि ११ वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना देखील विशेष क्रीडा गुण सवलतीत सामील केले तर विद्यार्थ्यांना खेळापासून पालकवर्ग अभ्यासाच्या कारणावरुन परावृत्त करणार नाही आणि विद्यार्थी खेळाचा सराव नियमितपणे खंड न पडता करु शकतील. तसेच शाळांचा आंतरशालेय स्पर्धेतील १०० टक्के सहभाग होण्याच्या दृष्टीने मदत होईल. यासाठी शालेय क्रीडा स्पर्धामध्ये विविध स्तरावर सहभागासाठी विशेष क्रीडागुण देण्यात यावे. हे गुण त्या विद्यार्थ्याला पुढील वर्गात प्रवेश देण्यासाठी तसेच एकूण टक्केवारीमध्ये जमा करावे. हे विशेष गुण पहिली ते नववी व अकरावीच्या खेळाडूंना देण्यात यंतील.

इयत्ता १ ते ८ वी साठी सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापन कार्यपध्दती लागू करण्यात आली आहे.त्यानुसार व्यापक अध्ययन प्रक्रियेचे सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि वर्तनातील दृश्यरुप किंवा वर्तन निष्पत्ती या दोन उद्दीष्टांवर भर देणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. सर्वंकष मुल्यमापनामध्ये आकरिक मूल्यमापन आणि संकलित मूल्यमापन पध्दतीचा समावेश केला आहे. शारीरिक शिक्षणाच्या परीक्षेमध्ये जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना अनुक्रमे २५, ५०, ७५ व १०० अधिक गुण देण्यात येतील.

## ३.२ जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्ध्येमध्ये प्राविण्य मिळविणा-या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान

शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा कौशल्य दाखविण्याकरिता स्पर्धा महत्वपूर्ण आहेत. जिल्हास्तरावरील स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभाग घेऊन खेळाडूंना संधी उपलब्ध करण्यासाठी शाळांना प्रोत्साहीत करणे आवश्यक असल्याने प्रचलित योजनेचे पुर्नमूल्यांकन करण्यात यावे.शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणा-या जिल्हास्तरीय, आंतरशालेय सर्व खेळांमधील वैयक्तिक प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक संपादन करणा-या व सांघिक प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविणा-या शाळांचे गुणांकन करुन १४, १७ व १९ वर्षाखालील मुले - मुली वयोगटातील सर्वोत्कृष्ट शाळांना प्रत्येक गटासाठी प्रथम क्रमांक रु.१,००,०००/-, व्दितीय क्रमांक रु.७५,०००/- व तृतीय क्रमांक रु.५०,०००/-अनुदान देण्यात येईल.

संबंधित शाळातील प्रथम तीन क्रमांकापर्यंत आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदकविजेते खेळाडू तयार झाले तर ७.०० लाख रूपयांचे पारितोषिक शाळेस देण्यात यावे व चार ते दहा क्रमांकापर्यन्त आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदकविजेते खेळाडू तयार झाले तर ३.०० लाख रूपयांचे पारितोषिक शाळेस देण्यात यावे. तसेच राष्ट्रीय स्पर्धेतील पदकतविजेते खेळाडू तयार झाले तर २.०० लाख रूपयांचे पारितोषिक शाळेस देण्यात येतील.

प्रोत्साहन अनुदान संस्थेने खेळाडूंचे प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, गणवेश, रोख पारितोषिक इ. बाबीवर खर्च करणे बंधनकारक राहील. अनुदानाचा विनियोग अहवाल १ वर्षात करणे आवश्यक आहे. तीन वर्षानी याचे पुर्नमूल्यांकन करण्यात येईल.

## ३.३ क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहीत करण्यासाठी पुरस्कार व उच्च पदावरील सेवेतील संधी

अ) शाळांमधील क्रीडा शिक्षक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विकासाचे काम करीत आहेत त्यांना अधिक उत्साहाने काम करण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचे व योगदानाचे मुल्यमापन होऊन त्यांचा गौरव होणे आवश्यक आहे. उत्कृष्ट कार्य करणा-या शारीरिक शिक्षण शिक्षकास जिल्हा व राज्य स्तरावर प्रतिवर्षी उत्कृष्ट क्रीडा शिक्षक पुरस्कार देण्यात यावा. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात यावेत. या पुरस्काराचे स्वरुप राज्य स्तरावर रू.५०,०००/-रोख, गौरवपत्र व स्मृतिचिन्ह व जिल्हास्तरावर रु.१००००- रोख, गौरवपत्र व स्मृतिचिन्ह असे असावे.तथा शिक्षण विभागाच्या आदर्श पुरस्कारासाठी राज्य व जिल्हा स्तरावर देण्यात येणाऱ्या पुरस्कार रकमा देण्यात येईल.

ब) महाराष्ट्र शासनाने एच.डी.एड, बी पी एड, बी एड (शारीरिक शिक्षण) अर्हता प्राप्त शिक्षकांना वेतन सेवाज्येष्ठता व सेवाशर्तीच्या इतर बाबींकरिता बी एड पात्रतेशी समकक्ष समजण्यात यावे असा निर्णय घेतलेला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे आयोजित गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी या पदांच्या परीक्षेस बसण्यास बी.पी.एड. अर्हता प्राप्त शिक्षकांनाही पात्र समजण्यात यावे. तसेच जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील असलेल्या माध्यमिक शाळामध्यें बी.एड. अर्हता प्राप्त शिक्षकांप्रमाणेच बी.पी.एड.अर्हता प्राप्त शिक्षकांनाही सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीचा लाभ दिला जाईल.

## ३.४ खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य.



खेळाडूंना त्यांच्याकडे असलेले कौशल्य, क्षमता यामध्ये वाढ करण्यासाठी सातत्याने स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे, सरावाच्या माध्यमातून दैनंदिन कृती कार्यक्रम आखून नियोजनबध्द सराव करावा लागतो. या दरम्यान त्याला गंभीर इजा, दुखापत होऊन त्यांच्या भविष्याच्या जडणघडणीमध्ये परिणाम होतो. काही खेळाडूंची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची व सर्वसामान्य असते. यावेळी अचानक उद्‌भवलेल्या अपघातासाठी आर्थिक खर्च, तात्काळ इलाज अथवा उपचार न केल्यास त्याच्या भविष्यावर होणारा परिणाम, इ. बाबी विचारात घेता अपघातग्रस्त खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे आवश्यक आहे.



शालेय क्रीडा स्पर्धा, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभागी होणारे खेळाडू तसेच एकविध क्रीडा संघटनांद्वारे आयोजित होणा-या राज्य व राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंना याचा लाभ देण्यात यावा. तसेच वयोवृध्द नामवंत खेळाडूंनासुध्दा वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक सहाय्य करण्यात येईल.

**अपघातग्रस्त खेळाडूंना आर्थिक सहाय्य देण्याची मर्यादा.**

अ. खेळाडूस गंभीर स्वरुपाची दुखापत/अपघात/इजा झाल्यास कमाल रू.५.०० लाख किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या पन्नास टक्के

ब. खेळाडूस किरकोळ स्वरुपाची दुखापत झाल्यास कमाल रू.२.०० लाख पर्यत किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या पन्नास टक्के .

क. वयोवृध्द नामवंत खेळाडूंना वैद्यकीय उपचारासाठी रू.३.०० लाख किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या पन्नास टक्के


## ३.५ आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शिष्यवृत्ती .

भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारे आयोजीत केलेल्या स्पर्धेमध्ये पदक तालिकेत महाराष्ट्र राज्य गेली पाच वर्षे अव्वल स्थानावर आहे. खेळाडूने केलेल्या कामगिरीचा गौरव व प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या वतीने खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्यात येते. राष्ट्रीय स्पर्धेतील शालेय, ग्रामीण, महिला क्रीडा स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधीत्व करुन राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीसाठी प्रथम रू.९,०००/- द्वितीय रू.७,२००/- तृतीय रू.५,४००/- व सहभाग रू.३,०००/- तसेच आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील प्रथम रू.२४,०००/- द्वितीय रू.१८,०००/- तृतीय रू.१२,०००/- व सहभाग रू.९,०००/- इतकी वार्षिक शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतलेला आहे. खेळाडूने संपादन केलेल्या प्राविण्याबद्दल अनुज्ञेय असणारी शिष्यवृत्ती खेळाडूला तात्काळ उपलब्ध करुन देणेत येईल. प्रचलित शिष्यवृत्तीमध्ये दर तीन वर्षांनी २५ टक्यांनी वाढ करण्यात येईल.

## ३.६ वयोवृध्द खेळाडू मानधनात वाढ

खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आदर सर्वतोपरी करणे आवश्यक आहे. वयोवृध्द खेळाडूंना मानाने जगता यावे यासाठी प्रचलित मानधनात वाढ करण्यात येईल.

| अक्र | स्पर्धा स्तर | प्रचलित दर | नविन दर |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीयस्तर | रु.१५००/- | रु. ३०००/- |
| २ | आंतरराष्ट्रीय स्तर | रु.३०००/- | रु. ६०००/- |
| ३ | हिंद केसरी,रुस्तमे-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत किताब, महाराष्ट्र केसरी, | रु.४०००/- | रु.१०,०००/- |



## ३.७ कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ .

कुस्तीगिरांच्या परंपरेचा ऐतिहासिक वारसा राज्याने जपण्यासाठी शासनाने कुस्तीसाठीच्या प्रोत्साहन योजना राबविलेल्या आहेत. कुस्तीगिरांचा विशेष आहार व प्रोत्साहन देण्यासाठी मानधनाच्या मर्यादा सुवर्ण-२०००, रौप्य रु.१५००/- व कास्य-रु.१०००/- विविध गटातील प्राविण्यधारक तसेच सहभागी खेळाडूंना रु.५००/- मानधन प्रतिमहा करण्यात येत आहे.

## ३.८ खेळाडूंसाठी गौरव व प्रोत्साहन व बक्षिसे

आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनिय क्रीडा कामगिरी करुन राज्याचे नाव लौकिक करणा-या खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक यांना गौरव प्रोत्साहनपर बक्षिसे देवून सन्मानित करणे आवश्यक आहे. अन्य राज्यात ऑलिम्पिक, आशियाई, राष्ट्रकुल तसेच नॅशनल गेम्स इ. स्पर्धामधील पदक विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने अशा स्पर्धामधील पदक विजेत्या खेळाडूनांही नजिकच्या काळात रोख पारितोषिके देवून गौरविले आहे. कायमस्वरुपी रोख पारितोषिकांची योजना खालील प्रमाणे कार्यान्वित करण्यात येईल.

(रुपये लाखात)

| अ.क्र | स्पर्धा | सुवर्ण | रौप्य | कास्य |
|---|---|---|---|---|
| १ | ऑलिंपिक स्पर्धा | १००.०० | ७५.०० | ५०.०० |
| २ | विश्व अजिंक्यपद स्पर्धा | ३०.०० | २०.०० | १०.०० |
| ३ | एशियन गेम्स | १०.०० | ७.५० | ५.०० |
| ३ | राष्ट्रकूल स्पर्धा | १०.०० | ७.५० | ५.०० |
| ४ | युवा राष्ट्रकूल स्पर्धा, एशियन चॅंपियनशिप | ७.०० | ५.०० | ३.०० |
| ५ | नॅशनल गेम्स | ५.०० | ३.०० | २.०० |
| ६ | युथ ऑलिंपिक ज्यु. एशियन , ज्युनिअर विश्व अजिंक्यपद , शालेय आशियाई स्पर्धा | ३.०० | २.०० | १.०० |
| ७ | पॅराऑलिंपिक स्पर्धा | ३०.०० | २०.०० | १०.०० |
| ८ | पॅराएशियन स्पर्धा | ३.०० | २.०० | १.०० |

(क्रीडा मार्गदर्शक/प्रशिक्षक यांनाही रोख पारितोषिके देवून गौरविण्यात येईल.)

## ३.९ आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.

राज्यातील खेळाडू एकविध खेळ संघटनेच्या तसेच नामंकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतात. या खेळाडूंचा प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५ टक्के किंवा रु.१,००,०००/- या मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात येईल.

## ३.१० आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शूल्क, इ. करिता आर्थिक मदत करणे

खेळाडूला आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक कामगिरीसाठी सामोरे जाताना स्पर्धापूर्व प्रशिक्षण आधुनिक क्रीडा साहित्य, प्रशिक्षण उपकरणे, देश-विदेशामधील तज्ज्ञ क्रीडा प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तसेच समतोल आहार इ.बाबींवर आर्थिक तरतुदी अभावी खेळाडूंची वैयक्तिक कामगिरी उंचावण्यावर परिणाम होऊ नये याकरिता सहाय्यक अनुदानाची योजना खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आली आहे.

- क्रीडा साहित्य आयात करणे, गणवेश इ.बाबीसाठी रू.२.०० लाखापर्यंत अनुदान.
- देशविदेशातील प्रशिक्षण, निवास, भोजन, प्रवास, मार्गदर्शकांचे शूल्क यांना प्रतिवर्षी रू.५.०० लाखपर्यंत देण्यात येईल.
- ऑलिंपिक, जागतिक अजिंक्यपद, एशियन गेम्स, तसेच एकविध खेळ संघटनेच्या अशियाई स्पर्धा, राष्ट्रकुल व युवा राष्ट्रकुल, युथ ऑलिंपिक ज्यु. एशियन , ज्युनिअर विश्व अजिंक्यपद , शालेय आशियाई /राष्ट्रीय स्पर्धा इ.मध्ये सहभाग घेतलेला असावा.
- देशी–विदेशी नामांकित प्रशिक्षकांना दोन-तीन वर्षासाठी आकर्षक मानधन देवून करार करावा राज्यातील राष्ट्रीय -आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी प्रशिक्षणाचा कृति कार्यक्रम व्दारे प्रथम टप्यात शूटींग,ॲथलेटिक्स,कुस्ती, खेळांना प्राधान्य देण्यात येईल.
- युथ ऑलीपिक ज्यु. एशियन , ज्युनिअर विश्व अजिंक्यपद , शालेय आशियाई /राष्ट्रीय स्पर्धा (१७ व १९ वयोगट ) तसेच एकविध खेळ संघटनेच्या राष्ट्रीय स्तरावरील अजिंक्यपद स्पर्धेत गत तीन वर्षात किमान दोन सुवर्णपदक धारण करणा-या खेळाडूस विदेशामध्ये प्रशिक्षण, मार्गदर्शकांचे शूल्क, निवास, भोजन, प्रवास इ.करिता रू.२.०० लाखापर्यंत अनुदान देण्यात यईल.

## ३.११ क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू कुस्तीगीर यांना द्यावयाच्या सवलती, पुरस्कार नियमावलीत बदल.

**अ.** खेळाडूंनी केलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून केंद्र शासनाकडून दिले जाणारे अर्जुन, द्रोणाचार्य, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार तसेच राज्य शासनाचा जीवन गौरव पुरस्कार, शिवछत्रपती पुरस्कार(खेळाडू,संघटक), उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता, विशेष,एकलव्य पुरस्कार तसेच हिंद केसरी,रुस्तमे-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी किताब प्राप्त खेळाडूंना पुरस्कार तसेच प्रवास सवलत देण्याची योजना शासनाव्दारे कार्यान्वित आहे.अशा खेळाडूंना खालील सवलती दिल्या जातील.

- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, सिडको इ. शासकीय प्रकल्पात केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू तसेच हिंद केसरी,रुस्तमे-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी किताब प्राप्त खेळाडूंना सदनिकांसाठी आरक्षण ठेवण्यात येईल. क्रीडा संचालनालयाच्या शिफारशीसह शासनाच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येतील.
- केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू तसेच हिंद केसरी,रुस्तमे-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी किताब प्राप्त खेळाडूंना प्रवासात मोफत एस.टी.सवलत देण्यात येईल.
- शासकीय विश्रामगृहामध्ये वर्ग 'अ' दर्जाच्या अधिका-यांना अनुज्ञेय असलेल्या दराने आरक्षण दिले जाईल.
- शासकीय सेवेत कार्यरत असणा-या खेळाडूस सदर पुरस्काराने सन्मानित केल्यास आगाऊ दोन वेतनवाढी देण्यात याव्यात. तसेच अशा खेळाडूंना दैनंदिन सराव, प्रशिक्षण, स्पर्धा इत्यादीकरीता कामकाजातून विशेष सवलत देण्यात येतील.
- केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू यांचा अनुभवाचा इतर खेळाडूंना लाभ मिळावा यादृष्टीने असे खेळाडू क्रीडा प्रशिक्षण देण्यास इच्छुक असल्यास त्यांना दैनंदिन कामकाजातून अर्धवेळ सवलत देण्यात येईल. संकुले, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रे ही ठिकाणे प्रशिक्षणासाठी प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येतील.

### ब. पुरस्कार नियमावलीत बदल-

- राज्याच्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्ती, खेळाडू, संघटक यांचा यथोचित गौरव करण्यासाठी राज्य क्रीडा पुरस्कार देण्यात येतात. खेळाडू पुरस्कारासाठी गत पाच वर्षाच्या कामगिरीचा विचार करुन सर्वोकृष्ट तीन वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाते. सांघिक क्रीडा प्रकारात ९० व वैयक्तिक क्रीडा प्रकारात १२५ गुण प्राप्त खेळाडूंना पात्र ठरविण्यात येते. सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारात खेळले जाणा-या खेळांचा समावेश (उदा. शुटींग) तसेच बुध्दीबळ या खेळामध्ये ग्रँड-मास्टर किताब धारक खेळाडू पुरस्कारासाठी पात्र ठरत नाही. यासाठी पुरस्कार नियमावलीत बदल करण्यासाठी त्रिसदस्यीय समितीची स्थापना करण्यात येईल. ऑलिम्पिक व अशियाई स्पर्धेतील खेळांच्या पुरस्कार क्रीडा प्रकारात समावेश करण्यात येतील.

- **पुरस्कार रक्कमेत वाढ**



अ. जीवन गौरव पुरस्कार - रु. २.०० लक्ष

ब. शिवछत्रपती पुरस्कार (खेळाडू,संघटक), उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता, विशेष, एकलव्य पुरस्कार -रु.१.०० लक्ष

क. जिल्हा क्रीडा पुरस्कार – गुणवंत खेळाडू, कार्यकर्ता, मार्गदर्शक रु. ०.१० लक्ष

- **सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार**

केंद्र शासन कडून सर्वोत्कृष्ट खेळाडूचा सन्मान करण्यासाठी “राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार ” देऊन प्रतिवर्षी गौरविण्यात येते. या धर्तीवर महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट खेळाडूला पुरस्कार म्हणून रु.१.५० लक्ष, सन्मान चिन्ह देण्यात येईल.खेळाडूंची कामगिरी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा व राज्याचा लौकिक वाढविणारी असणे आवश्यक आहे.

### ३.१२ नागपूर येथील आमदार निवास कक्षाचे हिवाळी अधिवेशन वगळता खेळाडू निवासाकरिता वापर

नागपूर येथील आमदार निवासाचे कक्ष बंध हिवाळी अधिवेशन वगळता इतर कालावधीमध्ये क्रीडा विभागातार्फे मान्यता प्राप्त क्रीडा संघटना यांचे व्दारा आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय तसेच राज्यस्तरावर आयोजित क्रीडा स्पर्धा यासाठी रु. १५० प्रतीदिन प्रती कक्ष याप्रमाणे आरक्षित करुन वापरण्यात येईल.

### ३.१३ खेळाडूंना शासकीय निमशासकीय सेवेत आरक्षण व थेट नियुक्ती

खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रातील सेवेत ५ टक्के आरक्षण तसेच उल्लेखनीय कामगिरी करणा-या खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतलेला आहे. राज्य शासनाच्या अधिपत्याखालील विभागात खेळाडू या योजनेचा लाभ घेत आहेत. गट-अ व गट-ब च्या सेवेत थेट नियुक्ती देताना ऑलिंपिक, एशियन गेम्स, विश्व अजिंक्यपद,राष्ट्रकुल स्पर्धा मधील प्राविण्यधारक खेळाडू वर्ग अ साठी तसेच एशियन चॅम्पियनशिप,ज्यु. विश्व अजिंक्यपद, युवा राष्ट्रकुल इ.स्पर्धेतील प्राविण्यधारक खेळाडू वर्ग ब साठी पात्र समजण्यात येईल.

पोलिस सेवा प्रवेश अधिनियमामध्येही खेळाडूंना पोलिस भरतीत विशेष आरक्षण ठेवलेले आहे. या नियमावलीत अखिल भारतीय विदयापीठांचे स्पर्धामध्ये प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू पात्र ठरतात. यामध्ये पात्रता निकषातील स्पर्धेमध्ये विभागीय विद्यापीठ प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू पोलिस भरतीसाठी पात्र समजण्यात यावेत. तसेच शासकीय सेवेतील वर्ग ‘क’ व ‘ड’ साठी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना पात्र ठरविण्यात येईल.

## ४. क्रीडा वातावरण निर्मीती

### ४.१ स्पोर्टस नर्सरीची स्थापना

बालवयात मुलांना खेळाची आवड निर्माण करणे, मैदानाशी नाते जोडणे मनोरंजनातून खेळाची माहिती करुन देणे यासाठी स्पोर्टस नर्सरीची स्थापना करणे आवश्यक आहे. शासनमान्य नोंदणीकृत खाजगी संस्थांना स्पोर्टस नर्सरी स्थापन करण्यासाठी आर्थिक मदत देऊन प्रोत्साहीत करण्यात येईल.

स्पोर्टस नर्सरीमध्ये ३ ते १२ वयोगटाच्या मुलांना प्रवेश देण्यात यावा. लहान मुलांचे ३ ते ७ व ८ ते १२ अशा दोन गटात विभागणी करुन प्रशिक्षण दिल्यास ते अधिक उपयुक्त ठरेल. सायंकाळ सत्रात स्पोर्टस नर्सरी कार्यान्वित कराव्यात. प्रशिक्षक मानधन, क्रीडा साहित्य, व्यवस्थापन, क्रीडांगण देखभाल यासाठी सहाय्यक अनुदान देण्यात येईल.

तसेच सदर स्पोर्टस् नर्सरीच्या अभ्यासक्रमामध्ये जनरल फिटनेस, मनोरंजनात्मक खेळ, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स इ.खेळांचा समावेश असावा. तसेच प्रत्येक खेळाच्यासुध्दा स्वतंत्र स्पोर्टस् नर्सरी सुरु करण्यात याव्यात जेणेकरुन लहान वयातच मुलांना खेळाची आवड निर्माण होईल व तंत्रशुध्द प्रशिक्षणसुध्दा देता येईल. अंगणवाडीच्या धर्तीवर क्रीडा नर्सरी योजना चालू करण्यात येईल

नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका यांनी बाग, मनोरंजन केंद्र व खेळासाठी आरक्षित असलेल्या सार्वजनिक जागांमध्ये स्पोर्टस नर्सरी विकसित करण्यात याव्यात. नगर विकास विभागाने यासंदर्भातील नियम निर्गमित करावेत. ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायतीची मैदाने व पायका योजनेअंतर्गत विकसित केलेल्या मैदानांचा वापर केला जाईल.

### ४.२ क्रीडा वाङःमय निर्मिती, क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना .

अ) क्रीडा वाङःमय निर्मिती :- खेळाडूंना खेळाच्या नियमाबरोबरच मानसशास्त्र, आहारशास्त्र, वैद्यकशास्त्र, प्रेरणा देणारे वाङःमय, दुखापतीवर इलाज, शारीरिक क्षमता विकसित करणा-या शास्त्रोक्त पध्दती, व्यायामाचे महत्त्व, खेळाडूंच्या स्तरनिहाय कामगिरीचे उच्चांक व विक्रमाच्या नोंदी, खेळातील कौशल्याची शास्त्रोक्त माहिती, शरीररचना शास्त्र, इ.ची माहिती क्रीडा वाङःमयाच्या माध्यमातून खेळाडूंना देणे अत्यावश्यक आहे.क्रीडा वाङःमयामध्ये पुस्तके, सी.डी., कॅसेट, फोटोग्राफी इ.च्या निर्मितीची नितांत गरज आहे.

क्रीडा क्षेत्रातील तज्ञ, प्रशिक्षक, साहित्यिक हे आपल्या अनुभवाच्या आधारावर तंत्रशुध्दपणे विविध क्रीडा प्रकार व साहसी खेळांची पुस्तके त्याचबरोबर सी.डी., कॅसेट, फोटोग्राफी इ. तयार करु इच्छितात अशा व्यक्ती/संस्थांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल..

या क्षेत्रातील कार्य करणा-या खेळाडू, प्रशिक्षक यांना संशोधनाची ओळख, अभ्यास, संदर्भ साहीत्य वाचण्यासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे . जिल्हा व तालुका स्तरावर क्रीडा ग्रंथालयाची निर्मिती करण्यात यावी या ठिकाणी संगणक व इंटरनेटची सुविधा असावी.

त्यासाठी आवश्यक ती स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात यावी. प्रत्येक शाळेस रू.१०,०००/- चे अनुदान देण्यात येईल. तसेच राज्यशासनाची सुरुवातीची जी योजना आहे ती अद्ययावत करण्यात येईल. या योजनेअंतर्गत क्रीडा वाङःमय, फिल्म अथवा आवश्यक बाबी खरेदी करण्यासाठी तज्ञ समितीची नियुक्ती करण्यात यावी व तिच्या शिफारशीनंतरच शाळांनी ते खरेदी करावे.



### ब) क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना :-

शिवछत्रपती क्रीडा नगरी, बालेवाडी येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संकुलामध्ये अद्ययावत क्रीडा ग्रंथालय व भव्य क्रीडा वस्तु संग्रहालय उभारण्यात यावे.यासाठीची आर्थिक तरतूद करण्यात यावी.देशाच्या व राज्याच्या क्रीडा क्षेत्रासोठी बहुमोलाचे योगदान असणाऱ्या खेळाडू मान्यवरांच्या आठवणी यामध्ये जपण्यात येतील. या वस्तुसंग्रहालयासाठी भेटवस्तु देण्याचे आवाहन केले जाईल.

## ४.३ क्रीडा अभियान

क्रीडा हा शालेय शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षणाबरोबरच खेळाचे महत्त्व जपणे अत्यावश्यक आहे. शिक्षणाचे महत्त्व सामाजिक व आर्थिक विकासाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक असल्याने शासनाने सर्व शिक्षा अभियान शिक्षणाच्या प्रगतीसाठी हाती घेतलेले आहे. या अभियाना अंतर्गत मिळणा-या निधीतून क्रीडा अभियानाची स्वतंत्रपणे योजना तयार करण्यात यावी. या योजनेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा, क्रीडा साहित्य, प्रशिक्षण, क्रीडा महोत्सव, शिक्षकांचे क्रीडाविषयक चर्चासत्र, क्रीडा सुविधांचा विकास, इ.बाबींचा विकास करण्यासाठी अनुदान देण्यात यावे. शाळांमधील जे विद्यार्थी क्रीडांगणावर खेळावयास येतात अशा विद्यार्थ्यांसाठी क्रीडा अभियान योजना राबविण्यात याव्यात. तसेच ज्याप्रमाणे सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांना आहार दिला जातो त्यातूनच खेळाडूंना पौष्टिक आहार देण्यात येईल. सर्व शिक्षा अभियान ही योजना केंद्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असल्याने केंद्र शासनाच्या मान्यतेने योग्य ते बदल करण्यात येतील.

## ४.४ शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासनांचे महत्त्व जागविणे

शालेय विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी करणे, विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, लवचिकपणा तसेच निरोगी जीवनासाठी योगासनाच्या माध्यमातून सर्वांगीण व्यायाम देणे आवश्यक आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी मानधनावर योग शिक्षक नेमण्याचा निर्णय घेण्यात येईल.

## ४.५ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असणा-या विविध समित्यांमध्ये शिक्षण समिती कार्यान्वित आहे. शारीरिक शिक्षण व क्रीडा हा शिक्षणाचा अविभाज्य घटक असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये या विषयाचे महत्त्व, अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, मूलभूत सोयी-सुविधा यांचा वेळोवेळी आढावा होणे आवश्यक आहे. यामुळे विदयार्थ्यांमध्ये आरोग्य, शारीरिक सुदृढता याबाबतची जाणीव प्रभावीपणे होण्यास सहाय्य होण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांचे स्तरावर शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना करण्यात येईल.

## ४.६ खेळाव्दारे सर्वांसाठी सुदृढता

### अ. शासकीय-निशासकीय, सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन :-

देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रक्रीयेमध्ये आरोग्य संपन्न मनुष्यबळ प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या परिणाम करत आहे . राज्यातील प्रत्येक नागरिक सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. वृध्द नागरिकांमध्ये आरोग्य संपन्न जीवनाचे महत्व बिंबवण्यासाठी सर्वांगीण विकास साधण्याकरिता क्रीडा स्पर्धा व खेळ यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. शासकीय, निमशासकीय विभाग, साखर कारखाने, सहकारी संस्था, सूत गिरण्या, महामंडळे, औदयोगिक प्रतिष्ठाने या ठिकाणी कार्यरत कर्मचा-यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन संबंधित विभागामार्फत करण्यात यावे.कर्मचा-यांची शारीरिक तंदुरुस्ती व कार्यक्षमता वाढीस लागून उत्पादकता वाढीस लागेल.




**ब. नागरीकांमध्ये खेळाची  व व्यायामाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे :-**

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत नागरीकांच्या जीवन शैलीवर परिणाम होवून ताणतणाव वाढत आहे. व्यायाम व शारीरिक हालचालींच्या अभावी नागरीकांना दुर्धर आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे.नागरीकांमधील मानसिक तणाव कमी होऊन शारीरिक तंदुरुस्ती विकसित करण्यासाठी खाली उपक्रमाचे आयोजन करण्यात येईल.

१. नागरी विकास आराखडयातील राखीव भूखंडावर क्रीडांगण /खेळाच्या सुविधा विकसीत करण्यासाठी  संबंधित प्राधिकरण नियोजनात्मक विकासाचा आराखडा तयार करुन सुविधा विकसीत करुन नागरीकांना उपलब्ध करुन येईल.

२. नोंदणीकृत गृह निर्माण संस्था ,वसाहती मधील खुल्या जागेवर व्यायाम व मनोरंजनात्मक खेळांच्या  सुविधा विकसीत करण्यात येईल.

३. उद्यानांच्या ठिकाणी जॉगर्स पार्क,योगकेंद्र,तसेच खुले व्यायाम साहित्य बसविण्यात येतील.

४. नागरीकांना सायकलिंग, सामुहिक कवायती, गीरिभ्रमण, शारीरिक तंदुरुस्तीच्या चाचण्याचे आयोजन, पारंपारिक खेळांचे आयोजन करुन प्रोत्साहित करण्यात येईल. सदर उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय, राज्य सण, उत्सव व क्रीडा सप्ताहा या निमिताने करण्यात येईल.

## ४.७ क्रीडा विषयक योजनांमध्ये सुधारणा

**अ.जलतरण तलाव** :- जलतरण हा सर्वांग सुंदर व्यायाम असल्याने नागरिकांसाठी पोहण्याच्या सुविधा निर्माण व्हाव्यात, जलतरण पटूंना सराव, स्पर्धा इ. करिता जलतरण तलाव निर्मीती केली  जाते. बांधकाम, पाणीशुध्दीकरण यंत्रणा इ. बाबींचा खर्च विचार करता येणारा सहाय्यक अनुदानासाठी राज्य शासन व नोंदणीकृत संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था यांचा वाटा ८० : २० या प्रमाणात राहील. ५० मी **x** २१ मी साठी कमाल रु. १.२० कोटी, २५ मी **x** २१मी साठी कमाल रु.६०.०० लाख, २५ मी **x** १३ मी साठी कमाल रु.५०.०० लाख. अनुदान देण्यात येईल.




**ब. व्यायामशाळा विकास अनुदान .**

व्यायामाची आवड जतन करण्यासाठी ग्रामीण व नागरी भागात व्यायामशाळा विकास योजनेतून बांधकाम व व्यायामशाळा साहित्यासाठी रु.२.०० लाखाच्या मर्यादेत सहाय्यक अनुदान देण्यात येत आहे.  बांधकाम व व्यायाम साहित्याचे दरात वाढ झाली असल्याने ही मर्यादा रु.७.०० लाख करण्यात येतील.

### क. क्रीडांगण विकास योजना .

राज्यात विविध खेळांची सुयोग्य क्रीडांगणे तयार व्हावीत यासाठी २०० मी/४०० मी. धावनमार्ग, विविध खेळांची क्रीडांगणे, क्रीडांगणे समपातळीत करणे, क्रीडांगणास कुंपण, प्रसाधनगृह, भांडारगृह, पाणी पुरवठा व्यवस्था इ. करिता नोंदणीकृत शैक्षणिक व क्रीडा संस्थांना दर्जेदार सुविधा निर्मितीसाठी होणारा खर्च विचारात घेता या योजनेची मर्यादा रु.७.०० लक्ष पर्यंत वाढविण्यात येईल. या योजनेतून शैक्षणिक संस्थांना विविध खेळांचे क्रीडा साहित्य, तायक्वांदो, ज्युदो, कराटे, जिम्नॅस्टिक्स, कुस्ती कबड्डी तसेच उंच उडी मॅट घेण्याचा अंतर्भाव करण्यात येईल. यासाठी मर्यादा रु.३.०० लाख राहील. एकच संस्था वारंवार अनुदान घेणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

### ड. गांव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा :-



गांव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा या योजनेमधून बांधकाम, क्रीडांगण समपातळीत करणे व त्याभोवती कुंपण यासाठी या योजनेतून सहाय्य केले जाते. या योजनेचे उद्दिष्ट क्रीडांगण विकास व व्यायामशाळा विकास या योजनेतून पूर्ण करता येते. केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पंचायत युवा खेळ व क्रीडा अभियान या योजनेतून ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर क्रीडा विषयक किमान पायाभूत सुविधा निर्माण करण्याची योजना कार्यरत आहे.त्यामुळे गांव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा विकास ही योजना बंद करण्यात येईल.



## ४.८ महानगरपालिका, नगरपालिका खेळ व संघ दत्तक घेणे, क्रीडा विषयक बाबीवर ५ टक्के खर्च करणे

महानगरपालिका, नगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात क्रीडा विकासाच्या उद्दीष्टासाठी राज्याच्या पहिल्या धोरणात सुचविलेल्या शिफारशी नगरविकास विभागाने दि.९ मार्च १९९८ च्या शासन निर्णयान्वये लागू केल्या आहेत. यामध्ये विकास आराखडयातील क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या जमिनीचा विकास, क्रीडांगणावरील अतिक्रमणे काढणे, क्रीडांगण विकसित करणे, विविध खेळांच्या खेळाडूंना बक्षिसे, खेळ किंवा संघ दत्तक घेणे इ. बाबींवर खर्च करण्यास मंजूरी दिली आहे.

बहुतांशी नगरपरिषदेमध्ये खेळ अथवा संघ दत्तक घेण्याच्या बाबींवर कार्यवाही झाली नसल्याने, या धोरणात खेळाडूंचा दर्जा सुधारण्यावर लक्ष केंद्रीत करण्याचे उद्दिष्ट असून खेळाडूंना तंत्रशुध्द प्रशिक्षण, आवश्यक साहित्य, दर्जेदार सुविधा, प्रोत्साहनात्मक मानधन देण्याबाबत महानगरपालिका व नगरपालिका यांनी पुढाकार घ्यावा. नगरविकास आराखडयातील क्रीडांगणासाठी राखीव क्षेत्रे मर्यादित कालावधी निश्चित करुन विकसित करावीत. महापौर, नगराध्यक्ष यांनी विशेष लक्ष देऊन नगरपालिका क्षेत्रातील क्रीडा कृती कार्यक्रम निश्चित करावा. प्रतिवर्षी एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के क्रीडाबाबीवर खर्च करण्यासाठी बंधन करण्यात येईल. नगरपालिका व महानगरपालिका यांनी क्रीडांगण विकसित करण्यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडावर क्रीडा विषयक सुविधा प्राधान्याने विकसित

करावयात, हे भूखंड अन्य प्रयोजनासाठी वापरण्यात येऊ नये.

बृहन्मुंबई विशेष कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत क्रीडा संकुल उभारण्याचा विशेष कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. मुंबई हे राजधानीचे व मोठी नागरीवस्ती असणारे शहर असून नामांकित खेळाडूंचे निवास या परिक्षेत्रात येतात. या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय दर्जाची सुविधा सराव व प्रशिक्षणासाठी उपलब्ध होतील. उदयोन्मुख खेळाडूंना खेळाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महानगरपालिका व प्रशासनाने निश्चित कालावधीत (दोन वर्षात) संकुल उभारावीत अन्यथा राज्य शासनाने विशेष अधिकाराचा वापर करुन क्रीडांगणासाठी राखीव ठेवलेल्या जागा संकुल उभारण्यासाठी ताब्यात घेण्यात येतील.

## ५. क्रीडा महोत्सवांचे आयोजन

### ५.१ शाळांचा क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग

शाळांनी विद्यार्थ्यांना आंतर शालेय स्पर्धेमध्ये खेळण्याची संधी उपलब्ध करुन देणे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीसाठी अनिवार्य आहे. प्रत्येक शाळेनी क्रीडा विभागा मार्फत राज्यात आयोजित करण्यात येणा-या क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घ्यावा, तसेच त्यासाठी शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास प्रवृत्त करावे, जेणे करुन शाळेची गुणवत्ता वाढून विद्यार्थ्यांच्या अंगातील क्रीडा गुणांना वाव मिळेल. प्राथमिक शाळांना स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी सद्य:स्थितीत शासन अनुदान दिले जात नाही, यामुळे राज्यातील प्राथमिक शाळा क्रीडा स्पर्धेपासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आलले आहे. सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत उपलब्ध होणा-या निधितून क्रीडा विषयक विकासाच्या सुविधा तसेच स्पर्धांसाठी प्रवास खर्च, क्रीडा गणवेश, स्पर्धेदरम्यान अल्पोपहार व भोजन इ. बार्बीवरील खर्च ग्राहय धरण्यात यावा व यासाठी तरतूद करण्यात येईल.



क्रीडा संचालनालयामार्फत विविध क्रीडा स्पर्धा तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आयोजित केल्या जातात. माध्यमिक शाळांना व शैक्षणिक संस्थांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करण्याकरिता विशेष क्रीडा अनुदानाची तरतूद करण्यात येत आहे. यात क्रीडा साहित्य, स्पर्धासाठी प्रवास खर्च ,खेळाडूंच्या आहारासाठी दैनिक भत्ता इ.बाबी ग्राहय धरण्यात येईल. राष्ट्रीयस्तर ते तालुका हा स्पर्धा आयोजनाचा घटक असून या स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी झालेला खर्च शासन मान्य समजण्यात येईल.

### ५.२ शालेय क्रीडा स्पर्धा

अ) महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातर्फे तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, विभागस्तरीय व राज्यस्तरीय अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. क्रीडा खात्यातील मनुष्यबळ, खेळांची संख्या व आर्थिक तरतूद पाहता स्पर्धांचे आयोजन योग्य प्रकारे करण्यास अनेक अडचणी येत आहेत. यासाठी खेळांची संख्या मर्यादित करणेत येत आहे.

- क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे प्रतिवर्षी आयोजित होणा-या शालेय, महिला, ग्रामीण(पायका), साई इत्यादी क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक प्रत्येक वर्षी दिनांक २० जून पर्यंत प्रसिध्द करण्यात यावे. तयेच या स्पर्धेतील राज्य व राष्ट्रीय प्राविण्य प्राप्त खेळाडू व शाळांची नावे क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
- ऑलिम्पिक स्पर्धेत अंतर्भूत असणारे महत्वाचे खेळ तसेच राज्यातील महत्वाचे पारंपारिक खेळ ( ब-गट) यामध्ये ( कबड्डी, खो-खो, कुस्ती व मल्लखांब) अशी वर्गवारी करण्यात यावी. आणि ऑलिंपिकेतर मान्यता प्राप्त खेळ हे तिस-या गटात ( क-गट) असावेत.
- महाराष्ट्र राज्याला पुढील पाच वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करता येईल असे ‘ब’ गटातील खेळ निवडून त्यांचा ‘अ’ गटात समावेश करावा. ‘अ’ गटातील खेळांवर विशेष लक्ष देऊन सर्व आवश्यक बाबींना प्राधान्य देण्यात येईल.
- आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात येईल.
- साहसी खेळांना जगभरात महत्व प्राप्त झाले असून याव्दारे मुलांमध्ये साहसी वृत्तीची वाढ होणे, नेतृत्व गुणांचा विकास, व्यक्तिमत्व विकास इ. फायदे होतात. साहसी खेळांमध्ये स्पर्धात्मक पातळीवर अतिशय कमी खेळ खेळले जात असून स्पोर्ट क्लाईंबिंग हा खेळ

जागतिक पातळीवर मोठया प्रमाणात स्पर्धात्मक दृष्टया खेळला जातो. शालेय विदयार्थ्यींसाठी स्पोर्टस क्लाईबिंगच्या सुविधा विकसीत करुन स्पर्धा आयोजित करण्यात येतील.

● भारतीय शालेय खेळ महासंघाच्या आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तसेच इतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी विविध स्तरावरील अनुदाचे दर मर्यादेत वाढ करण्यात येत आहे.तसेच प्रत्येक पाच वर्षाने यामध्ये कालानुरुप सुधारणा करण्यात येतील.

● भारतीय शालेय खेळ महासंघाच्या विद्यमाने आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तसेच इतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये राज्याचा संघ सहभागी होण्यासंबंधी विविध स्तरावरील अनुदानाचे दर सांघिक खेळासाठी रु.५०/- प्रति संघ व वैयक्तिक क्रीडा प्रकारातील प्रत्येक बाबी साठी रु.२५/- प्रति खेळाडू अशी फी आकारण्यात येईल. महानगर नगरपालिका परिक्षेत्रातील शैक्षणिक संस्था व इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सुधारीत फी दर लागू करण्यात येतील. तसेच जिल्हा क्रीडा परिषद संलग्न शुल्क प्रति वर्षी ठरविण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा परिषदेला राहील. जमा निधी जिल्हा क्रीडा परिषदेने जिल्हयातील क्रीडा स्पर्धा आयोजन व क्रीडा विकासासाठी वापरावा.

सद्यस्थितीत राज्यस्तरीय क्रीडास्पर्धा व राष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबीरासाठी भोजन व निवासासाठी रू.१५०/- तरतुद आहे. स्पर्धा या चांगल्या वातावरणात आयोजित करणे आवश्यक असल्याने स्पर्धेच्या खर्चाच्या मर्यादेत खालीलप्रमाणे वाढ करण्यात येईल.

| स्पर्धा | स्तर | प्रचलित दर प्रतिखेळ | समितीने शिफारस केलेले दर प्रतिखेळ |
|---|---|---|---|
| शालेय क्रीडा स्पर्धा | तालुका | ५००/- | १०,०००/- |
| | जिल्हा | २५००/- | १५०००/- |
| | विभागीय | २५००/- | १५०००/- |
| | राज्य | विशिष्ट नियमानुसार | विशिष्ट नियमानुसार |
| | राष्ट्रीय | -- | रु. १०.०० लक्ष |

(टीप :- विशिष्ट नियमानुसार म्हणजेच स्पर्धांमधील खेळाडू सहभागी संख्या यांचा भोजन व निवास खर्च प्रतिदिन रू.१५०/- राज्यस्पर्धा संयोजनासाठी रु. १.०० लक्ष) व राष्ट्रीय स्पर्धा आयोजनासाठी रु. १०.०० लक्ष)



महिला व साई स्पर्धा जिल्हा व राज्यस्तर घेण्यात येतात. राज्यात जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर अनुक्रमे स्पर्धा घेतल्या जातात. तसेच पायका क्रीडा स्पर्धा जिल्हा राज्य स्तरावर घेतल्या जातात यावेळी भारतीय क्रीडा प्राधिकरण, केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेले अनुदान अपुरे असल्याने वरील नमुद केल्या प्रमाणे विभाग व राज्य स्तरावरील स्पर्धांसाठी अनुदान देण्यात येईल.

काही खेळांना अल्प प्रतिसाद असतो अशा खेळांना अनुदान देतांना प्रत्यक्ष खर्चाचा विचार करण्यात येईल. जिल्हयात प्रचलित असणा-या खेळांना भरघोस प्रतिसाद असतो यावेळी स्पर्धांवर होणारा खर्च अनुदान मर्यादेपेक्षा अधिक असतो, अशा वेळी जिल्हयासाठी अनुदान मंजूर करताना विचार करण्यात येईल. उदा.क्रिकेट, फूटबॉल, ॲथलेटिक्स,हॉकी, जलतरण, बॅडमिंटन आदी खेळांना किमान जिल्हा स्तरावर रू.३०,०००/- इतके अनुदान करण्यात यावे. महानगरपालिका परिक्षेत्रामधिल शाळांना क्रीडा स्पर्धेसाठी स्वतंत्र जिल्हास्तर दर्जा देण्याचा

निर्णय शासनाने घेतलेला आहे. राज्यातील काही महानगरपालिका अशा स्पर्धा आयोजना वरील खर्च करीत नाहीत, याची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी नगर विकास विभागा मार्फत स्वतंत्र आदेश महानगरपालिकांना निर्गमित करण्यात येतील. महानगरपालिकांना शासनाच्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धा आयोजन करणे बंधनकारक करण्यात येईल.

**ब) शासकीय/निशासकीय सेवेतील खेळाडूंना सवलती –**

शासकीय,निमशासकीय सेवेतील खेळाडूंना स्पर्धा,प्रशिक्षण शिबीर इ.मध्ये सहभागी होता यावे यासाठी रजा /अग्रीम वेतनवाढी याबाबतचे प्रचलित शासन निर्णयात कालसुसंगत बदल करण्यात येतील.


**क) खेळाडूंच्या पालकांना रजा सवलती –**

अधिकृत राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेणा-या अल्पवयीन , किशोरवयीन व महिला खेळाडूंचे सोबत त्यांचे पालक देखील उपस्थित राहतात. शासकीय,निमशासकीय सेवेतील पालकांना ,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा कालावधीत सर्व प्राथम्याने विशेष रजा देवून तो सेवाकालावधी समजण्यात यावा. तर राज्यस्तर सहभागासाठी देय रजा सर्व देण्यात याव्यात. खाजगी व्यवस्थापनात काम करणा-या खेळाडूंच्या पालकांना त्यांचे आस्थापनांनी विशेष रजा मंजूर करावी.

## ५.३ क्रीडा महोत्सव, क्रीडा दिन - क्रीडा सप्ताह साजरा करणे

**अ) क्रीडा महोत्सव** - खेळाच्या माध्यमातून आनंददायी वातावरण निर्माण होवून खेळामुळे ताण-तणाव कमी करणे शक्य आहे तसेच क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण करणे, सामाजिक एकोपा, मनोरंजन यासाठी खेळ आवश्यक आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून खेळाच्या विकासाला चालना देता येणे शक्य आहे. विविध स्पर्धांचे आयोजन केल्याने क्रीडा संस्कृतीच्या वाढीस पूरक वातावरण तयार होईल. शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थी किमान एका सांघिक क्रीडा प्रकारामध्ये व तीन वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये सहभागी झाला पाहिजे. प्रतिवर्षी शाळांमध्ये क्रीडा महोत्सव आयोजित करणे आवश्यक आहे. या महोत्सवामध्ये आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करुन स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा गौरव करण्यात यावा.

**ब) क्रीडा दिन-क्रीडा सप्ताह साजरा करणे** - मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो.तसेच दि.१२ ते १८ डिसेंबर हा कालावधी क्रीडा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह खेळाडूंना अधिक प्रेरणादायी ठरावा यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सन्मान, अनुभवी खेळाडूंच्या कडून नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी चर्चासत्र, परिसंवाद, प्रदर्शनिय सामने, खेळांची तंत्रशुध्द माहीती, प्रशिक्षकांचे अनुभव, क्रीडा विषयक संशोधन साहीत्याची ओळख, नागरिकांमध्ये व्यायामाचे महत्व जागविण्यासाठी विविध उपक्रम, सायकल रॅली यांचे आयोजन करण्यात यावे.





क्रीडा सप्ताह दरम्यान ३ ते ५ कि.मी.ची दौड आयोजित करावी. यामध्ये समाजातील प्रतिष्ठीत नागरीक, लोकप्रतिनिधी, खेळाडू, विदयार्थी, क्रीडा प्रेमी क्रीडा संघटक, क्रीडा मंडळे इ.समावेश असावा. प्रत्येक तालुक्यासाठी क्रीडा दिन रु.१०,०००/- व क्रीडा सप्ताहासाठी रु.२५,०००/- अनुदान देण्यात येईल.

शाळेच्या माध्यमातून जास्तीत जास्त खेळाडूंचा सहभाग क्रीडा स्पर्धांमध्ये असणे आवश्यक आहे. खेळाडूंना जिल्हा क्रीडा संकुलामधील सुविधा सरावासाठी सवलतीच्या दरात सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

### ५.४ छ.शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा, खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, कै. भाई नेरुरकर चषक खो-खो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा सहाय्यक अनुदानात वाढ करणे मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन

राज्यातील खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या समवेत खेळण्याची संधी मिळावी, त्याचा दर्जा पहाता यावा, राज्यात क्रीडा वातावरण चांगले राहण्यासाठी छत्रपती शिवाजी चषक स्पर्धा व खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा या राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. ग्रामीण व शहरी भागात खो-खो व व्हॉलीबॉल हे खेळ मोठया प्रमाणांत खेळले जातात. राज्यात या खेळांचा प्रचार व प्रसार व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कै. भाई नेरुरकर चषक खोखो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा आयोजन करण्यात येते.

खेळाडूंना सकस आहार, निवास व्यवस्था, प्रेक्षक गॅलरी, प्रवास खर्च, पारितोषिके, आयोजनावरील खर्च पाहता वरील प्रत्येक स्पर्धेसाठी रु.५०.०० लक्ष अनुदान देण्यात येईल. हॉकी या खेळाच्या स्पर्धा घेण्यात याव्यात. तसेच व्यायामाची नागरिकांमध्ये आवड निर्माण करुन त्यांना तंदुरुस्ती अजमवता यावी, खेळातील सहभाग वाढावा यासाठी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन व्यापक स्वरुपात करण्यात यावे. राज्यस्तरावर रु.५०.०० लक्ष अनुदान देण्यात येईल. तालुका व जिल्हास्तरावर असे उपक्रम भव्य प्रमाणात खाजगी संस्था व शासन यांच्या सहभागातून घेण्यात येतील.

## ६. तांत्रिक मनुष्यबळाचा विकास

### ६.१ खेळांसाठी जादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा या विषयाचा अभ्यासक्रमात सामावेश करणे

**अ) वेळापत्रकात क्रीडा विषयांच्या किमान तासिका.**

इय-ता १ ली ते १०वी तील विदयार्थ्यांसाठी वेळापत्रकात क्रीडा या विषयासाठी आठवडयाला किमान ५ तासिका अशी यशपाल कमिटीची शिफारस आहे.खेळाच्या तासिका क्रीडा या विषयासाठीच उपयोगात आणाव्यात. अनेक शाळांमध्ये असे दिसून आले आहे की शिक्षण विभागाकडे मंजुरीसाठी देण्यात आलेल्या वेळापत्रकात जरी आठवडयाला पाच तासिका क्रीडा विषयासाठी राखून ठेवलेल्या असल्या तरी प्रत्यक्षात या तासिकांच्या वेळेमध्ये इतर विषयांच्या तासिका घेण्यात येतात. शिक्षण विभागाने या वेळापत्रकांची प्रभावी अंमलबजावणी करून आठवडयाला किमान पाच तासिका क्रीडा विषयासाठीच उपयोगात आणाव्यात तसेच खेळासाठी पोषक शरीर रचनेची गरज पाहता वेळापत्रकांना मंजुरी देताना सकाळच्या सत्रातील शाळांना पहिल्या तासिका आणि दुपारच्या सत्रातील शाळाना शेवटच्या तासिका क्रीडा विषयासाठी राखीव ठेवाव्यात. अशाप्रकारे दररोज किमान एक तासिका खेळासाठी अनिवार्य करण्यात येतील.

**ब) शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे पुर्नमूल्यांकन.**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामध्ये शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचा अंतर्भाव आहे. अभ्यासक्रमातून खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने विविध खेळांचे नियम,पूरक व्यायाम, खेळाडूंचा आहार, क्रीडा मानसशास्त्र, शरीरशास्त्र, दुखापती यांची माहिती देण्यात यावी तसेच प्रात्यक्षिक

स्वरूपात मैदानी खेळ, जलतरण, जिम्नॅस्टिक व योगा अशा मुलभूत खेळांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमाचे पुर्नमूल्यांकन करण्यासाठी समितीची स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये क्रीडा मानसशास्त्रज्ञ,आहारतज्ञ,शिक्षणतज्ञ,खेळाचे विशेष माहीती असणा-या सदस्यांचा समावेश करण्यात येईल.

## ६.२ क्रीडा संहिता तयार करणे .

राज्य शासनाच्या क्रीडा संचालनालया मार्फत प्रतिवर्षी शालेय,ग्रामीण (पायका), महिला क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतात.या स्पर्धांसाठी शासनमान्य संहिता सद्यःस्थितीत नाही. यामुळे तांत्रिक अडचणी, दंडात्मक कार्यवाही, तक्रार निवारण, खेळाडूंचे हक्क इ.साठी संहिता असणे आवश्यक आहे.

खेळाडूंकडे असणा-या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी ते विकसित करण्यासाठी जाणीव-पूर्वक प्रयत्न करावे लागतात. यामध्ये सराव, प्रशिक्षण, विविध स्पर्धांमध्ये सहभाग घ्यावा लागतो, अशा वेळी शैक्षणिक अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष होते. स्पर्धा, शिबीरे, प्रशिक्षण दरम्यान घटक चाचण्या आयोजित होत असतात. या कार्यकालातील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी खेळाडूंना विशेष सवलत देणे अत्यावश्यक आहे. मुख्याध्यापकांचे अधिकार, शारीरिक शिक्षकांची कर्तव्ये व त्यांच्या कामाचे मूल्यमापन व खेळाडू विदयार्थ्यांचे हक्क यांची माहिती होण्यासाठी शिक्षण संहितेच्या धरतीवर क्रीडा संहिता तयार करण्यात येईल.

शारीरिक शिक्षण व खेळ या विषयांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. (उदा. शारीरिक शिक्षण तासिका इतर विषयांसाठी देणे, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम अर्हता धारक शिक्षकांकडून शिकवला न जाणे, शाळांचा स्पर्धा सहभाग, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम अंमलबजावणी, क्रीडा साहित्य व मैदान उपलब्धता, स्पर्धेसाठी वयाचे दाखले, खेळाडूना मिळणा-या मूलभूत सोई सुविधा इ.) यासाठी शिक्षण संचालनालया प्रमाणे क्रीडा संचालनालयाच्या अधीनस्त कार्यालयांना वरील बाबी तपासणीचे अधिकार देण्यासंदर्भात क्रीडा संहितेत अंतर्भाव करण्यात येईल. क्रीडा संहिता तयार करण्यासाठी तज्ञांची समिती नियुक्त करण्यात येईल. समितीचे क्रीडा संचालक, शिक्षण संचालक व क्रीडा संघटना व क्रीडा शिक्षक संघटना यांचे प्रत्येकी २ प्रतिनिधि असतील. नवीन क्रीडा धोरण समितीने अहवाल सादर केल्यानंतर पुढील सहा महिन्यात तज्ञ समिती व्दारे तयार होणारी क्रीडा संहिता तात्काळ लागू करुन त्यास वैधानिक दर्जाही देण्यात येईल व शाळा तपासणीचे अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी/तालुका क्रीडा अधिकारी यांना देण्यात येतील.

## ६.३ शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन कार्यपध्दती

अ) केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम (Right of Children for free and compulsory educatation .Act 2009 (No.35.2009) केंद्र शासनाने पारीत केला आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्विकारली आहे.

इयत्ता १ ते ८ वी साठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्दती लागू करण्यात आली आहे. त्यानुसार व्यापक अध्ययन प्रक्रियेचे सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि वर्तनातील दृश्यरुप किंवा वर्तन निष्पत्ती या दोन उद्दिष्टांवर भर देणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. सर्वंकष मूल्यमापनामध्ये आकरिक मूल्यमापन आणि संकलित मूल्यमापन पध्दतीचा समावेश केला आहे.

व्यापक अध्ययन प्रक्रियेत अभ्यासक्रमातून खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने विविध खेळांचे नियम, पूरक व्यायाम, खेळाडूंचा आहार, क्रीडा मानसशास्त्र, शरीरशास्त्र, दुखापती यांची

माहिती देण्यात यावी. वर्तनातील दृश्यरुप किंवा वर्तन निष्पत्ती यामध्ये प्रात्यक्षिक स्वरूपात मैदानी खेळ, जलतरण, जिम्नॅस्टिक व योगा अशा मुलभूत खेळांना प्राधान्य देऊन त्यांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात येईल.

१० वी व १२ वी च्या परीक्षांमध्ये शारीरिक शिक्षणाचे महत्व जागवण्यासाठी, परीक्षा मंडळाव्दारा घेतल्या जाणा-या (उदा- विज्ञान) लेखी व प्रात्यक्षिक स्वरुपाच्या परीक्षा प्रतिवर्षी आयोजित करण्यात येतात याच धर्तीवर, शारीरिक शिक्षण या विषयाच्या परीक्षा घेण्यात येतील.

## ६.४ शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता

खेळांचे प्रशिक्षण तज्ञांमार्फत दिल्यास खेळाडूंना मुलभूत प्रशिक्षण मिळून त्यांच्यामधील सुप्त गुणांना चालना मिळेल. शाळांमध्ये क्रीडाविषयक अनुकुल वातावरण निर्माण करण्याबरोबरच शैक्षणिक संस्थांमध्ये असलेल्या सुविधां खेळाडूंना प्रशिक्षणासाठी वापरणे आवश्यक आहे. शाळेमध्ये वेळापत्रका व्यतिरिक्त शाळा सुरु होण्यापूर्वी व शाळा सुटल्यानंतर सकाळी व संध्याकाळी शाळेमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी क्रीडा प्रशिक्षण देण्यासाठी क्रीडा मार्गदर्शकाची नेमणूक करावी अथवा जे क्रीडा शिक्षक शाळेच्या वेळेव्यतिरिक्त शाळेमध्ये क्रीडा प्रशिक्षण देऊ शकतील अशा क्रीडा मार्गदर्शकांना किमान रू.५०००/- दरमहा मानधन देण्यात येईल व अशा शाळांमध्ये वेगवेगळया खेळाच्या ॲकेडमीज् सुरु करण्यात याव्यात. त्यास शिक्षण व क्रीडा विभागाकडून मान्यता देण्यात येईल.

शाळांमध्ये जे चार खेळ शिकविले जातात व ज्या शाळा सलग ४ ते ५ वर्षे राज्यस्तर स्पर्धेत सहभागी होत आहेत अशा शाळातील मानधनावरील नियुक्त केलेल्या क्रीडा मार्गदर्शकांचे मानधन देण्यात येईल.

## ६.५ क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर

खेळामधील बदललेले आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पध्दती, खेळामधील कौशल्याची ओळख, नवीन खेळांची ओळख, खेळांची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी शिक्षकांना करुन देणे आवश्यक आहे. तालुका,जिल्हा,विभाग,राज्य स्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानामध्ये भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रामध्ये होणारे बदल अवगत होण्यासाठी दरवर्षी किमान दहा दिवसांचे उजळणी वर्ग क्रीडा विभागा मार्फत नियमितपणे आयोजित करण्यात येतील.

राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेने प्राथमिक शिक्षकांसाठी व शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमिक विभागाने माध्यमिक शिक्षकांसाठी ही योजना राबवावी.

## ६.६ क्रीडा विभागाचे सक्षमीकरण .

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे मुख्यालय पुणे येथे असून मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, लातूर या आठ विभागाच्या ठिकाणी विभागीय उपसंचालक कार्यालये, ३५ जिल्हयांच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालये व ३१ तालुक्यांमध्ये तालुका क्रीडा अधिकारी कार्यालये कार्यरत आहेत.

क्रीडा संचालनालयाच्या नियंत्रणाखाली, शालेय क्रीडा स्पर्धा यामध्ये (४४ खेळ), ग्रामीण-(पायका) १० खेळ, महिला १२ खेळ व साई १० खेळ इत्यादी खेळांच्या गट निहाय स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. शासनाच्या विविध योजनांची राज्यात अंमलबजावणी, पंचायत युवा क्रीडा व खेळ अभियान मधील प्रतिवर्षी २८०० ग्रामपंचायत व ३५ पंचायत समित्यांच्या परिक्षेत्रात किमान क्रीडा सुविधांचा विकास, युवक कल्याण विषयक उपक्रमांचा विस्तार, विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाची उभारणी, खेळाडू शारीरिक क्षमता चाचण्या, क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापन इ.महत्वपूर्ण कामे करण्यात येतात. क्रीडा स्पर्धांचे संयोजन

संकुल व पंचायत खेळ क्रीडा अभियान अंतर्गत क्रीडा विषयक पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी पुरेशा मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत संचालनालयाच्या आस्थापनेवर ६२१ पदे मंजूर आहेत.क्रीडा व युवक सेवा संचालनालयात तसेच मत्रालयीन स्तरावर क्रीडा-युवा धोरणाचे प्रभावी अंमलबजावणीसाठी रिक्त पदे भरण्यात येतील. त्याचप्रमाणे आवश्यकतेनूसार नविन पदे निर्माण करण्यात येतील.

क्रीडा विभागाअंतर्गत क्रीडा धोरण व युवा धोरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी जलदगतीने होण्यासाठी अतिरिक्त पदे निर्माण करणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत अधिकारी व कर्मचारी वर्ग पुरेसा नाही अशी समितीचे स्पष्ट मत आहे. क्रीडा विभागातील मंत्रालयीन स्तरावर सचिव-१, उपसचिव-३, कक्ष/अवर सचिव-१२, सहाय्यक-१२, लेखापाल-१, तसेच अन्य प्रशासकीय कर्मचारीवर्ग असणे आवश्यक आहे.

- क्रीडा संचालनालयाच्या संचालक पदी, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी नियुक्त करण्यात येतात. शिक्षण संचालनालय, आरोग्य संचालनालय, नगर विकास संचालनालय, सार्वजनिक बांधकाम विभाग येथे संबंधित विभागातील अधिकारी पदोन्नतीने विभाग प्रमुख म्हणून नियुक्त केला आहे. क्रीडा संचालक या पदावर क्रीडा विभागातील वरिष्ठ अधिकारी पदोन्नतीने नियुक्त करण्यात येईल.

  शासनाच्या विविध योजना राबविण्यासाठी प्रत्येक स्तरावरील कार्यालयामध्ये खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग आकृतिबंध निश्चित करण्यात येईल.

- तालुकास्तर- तालुका क्रीडा अधिकारी-१, (गट-ब), क्रीडा मार्गदर्शक-२, क्रीडा अधिकारी-१, कनिष्ठ लिपीक-१ शिपाई-१ व मैदान सेवक-१ तालुका क्रीडा अधिकारी वगळता अन्य पदे मानधनावर भरण्यात येतील.

- जिल्हास्तर - जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी-१, क्रीडा अधिकारी-३, क्रीडा मार्गदर्शक-३, वरिष्ठ लिपीक-१,कनिष्ठ लिपीक-१, शिपाई-१ अशी पदे साधारण मंजूर आहेत. जिल्हा स्तरावर याशिवाय खालील पदे भरणे गरजेचे आहे. सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी-१, भांडारपाल-१, क्रीडा अधिकारी-२, मुख्यलिपीक-१, लेखालिपीक-१, वाहनचालक-१, सफाई कामगार-१, चौकीदार-१, मैदान सेवक-३ इत्यादी.

- विभागीयस्तर - विभागीय क्रीडा कार्यालयामध्ये उपसंचालक-१, क्रीडा अधिकारी-१, कार्यालयीन अधीक्षक-१, मुख्य लिपीक-१, लघुलेखक (निम्नश्रेणी)-१, वरिष्ठ लिपीक-२, कनिष्ठ लिपीक-२, वाहनचालक-१, शिपाई-२ अशी पदे मंजूर आहेत. याशिवाय विभागीय कार्यालयात खालील पदे भरण्यात यावी. क्रीडा अधिकारी-१, कनिष्ठ लिपीक-१, चौकीदार-१, क्रीडा अधिकारी-१, वरिष्ठ लिपीक-१, शिपाई-१ अशी जादा पदे नियुक्त करण्यात येतील.

- संचालनालय स्तर - क्रीडा धोरण, युवा धोरणा अंतर्गत येणा-या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच पंचायत खेळ क्रीडा अभियान कक्ष इ.साठी क्रीडा अधिकारी-५, मुख्य लिपिक-३, वरिष्ठ लिपिक-५, कनिष्ठ लिपिक-१०, शिपाई-५ इ. अतिरिक्त पदे निर्माण करण्यात येतील.

- क्रीडा व युवकसेवा संचालनालयाच्या आस्थापनेवर वर्ग-अ दर्जाच्या अधिका-यांना वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे. वाहन चालक मानधनावर नियुक्त करण्यात यावा.

- क्रीडा मार्गदर्शक या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना पदोन्नती देऊन प्रशासकीय

कामकाज देण्यात येते यामुळे यांचा क्रीडा विषयक अनुभव खेळाडूंना प्रशिक्षणासाठी देता येत नाही. केंद्र शासनाच्या क्रीडा प्राधिकरणा अंतर्गत कार्यरत असणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांच्या वर्गवारीच्या धर्तीवर राज्यातील क्रीडा मार्गदर्शकाचे वर्गीकरण करण्यात यावे. क्रीडा मार्गदर्शक हा एन.आय.एस. पदविकाधारक ही अर्हता आवश्यक राहील.

## ७. क्रीडा विद्यापीठाची स्थापना

### ७.१ महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करणे

महाराष्ट्र राज्यातील बहुतांश युवक सद्या महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर आपले शिक्षण पुर्ण करत आहेत. राज्यात २० विद्यापीठे व १० अभिमत विद्यापीठामध्ये सुमारे ८० लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयीन-विद्यापीठ स्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना क्रीडा संवर्धनाकरीता विशेष अशा सवलती अथवा अनुदानाच्या योजना राज्य शासनाकडून राबविण्यात येतील.

राज्यातील युवा समक्ष करण्याकरीता क्रीडा व शारीरिक शिक्षण हे माध्यम अत्यंत महत्वाचे आहे. त्याकरीता शालेय शिक्षणाप्रमाणे महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणामध्ये त्याचा समावेश असणे आवश्यक आहे. याकरीता खालील बाबी कार्यान्वित करण्यात येतील.

- मा. कुलगुरुच्या, राज्यस्तरीय उच्चस्तर समितीच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करण्यात येईल.
- महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळाने प्रतिवर्षी विद्यापीठ अंतर्गत खेळाडूंसाठी स्पर्धा,प्रशिक्षण शिबिरे व क्रीडा विकास उपक्रमाचे आयोजन करावे. संलग्नीत विद्यापीठांनी विद्यार्थी संख्येनुसार किमान शुल्क निश्चित करुन विशेष निधी संकलीत करावा. शासनाद्वारे यासाठी सहाय्यक अनुदान दिले जाईल.
- या मंडळाचा कार्यभार कार्यान्वयन करण्यासाठी संलग्नीत विद्यापीठांमधुन प्रतिनियुक्तीवर प्राध्यापक/कर्मचारी नियुक्त करावेत.
- राज्य शासनाकडून सदर समितीच्या नियंत्रणाखाली राज्यातील विद्यापीठामध्ये प्रतिवर्षी अश्वमेध क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यात येतील त्यासाठी स्पर्धा आयोजनासाठी रु. २०.०० लक्ष अर्थसहाय्य देण्यात येईल.

### ७.२ क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे



खेळाच्या विकासास सहाय्यभूत बाबींचा साकल्याने विचार करण्यासाठी मध्यवर्ती केंद्र असणे आवश्यक आहे. शारीरिक शिक्षण, क्रीडा विषयक अभ्यासक्रम, खेळाविषयक तंत्रज्ञानाची आधुनिक माहिती, संशोधन, राज्यातील शारीरिक शिक्षण महाविदयालय अभ्यासक्रमात सुसुत्रता इत्यादी विषयात प्रगती साधण्यासाठी राज्यात क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे गरजेचे आहे. विषयधिनिष्ठ विद्यापीठांची स्थापना देशात व राज्यात झालेली आहे (उदा.राज्यातील कृषि विद्यापीठे, पशु संवर्धन विद्यापीठ,नागपूर, विधी विद्यापीठ, बेंगलोर इ.)

राज्यात १२५ शारीरिक शिक्षण महाविद्यालये (बीपीई/एमपीएड) आहेत. ही महाविद्यालये राज्यातील विविध ८ विद्यापीठांना संलग्न आहेत.

राज्यात क्रीडा विदयापीठाची स्थापना करण्यात येत आहे. क्रीडा विद्यापीठाची स्थापना करताना खालील बाबींचा साकल्याने विचार करण्यात येईल.

१)क्रीडा विद्यापीठासाठी किमान ४० ते ५० एकर जागा उपलब्धता विदयार्थी, क्रीडाप्रेमी,

खेळाडू इ. व्यक्तींसाठी जाण्या-येण्यास सुयोग्य होईल अशी उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) विभागीय क्रीडा संकुलांची स्थापना करण्यात येत असून यामध्ये क्रीडाविषयक बांधकाम सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. क्रीडा विदयापीठाची स्थापना करताना या सुविधांचा वापर क्रीडा विदयापीठासाठी करण्यात येईल. यामुळे क्रीडा बांधकामासाठी अधिकचा खर्च होणार नाही.

३) राज्यात बीपीएड/ एमपीएड महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमामध्ये सुसुत्रता आणून एकच अभ्यासक्रम निश्चित करण्यात येईल.

४) शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक सुविधा निर्माण करण्यात येतील.

५) क्रीडा विद्यापीठाची स्थापना करताना प्रशासकीय कामकाज तसेच अभ्यासक्रम राबविण्यासाठी प्रारुप तसेच अभ्यासक्रमाच्या दृष्टीने निर्माण करावयाच्या सुविधा इ.साठी मा.कुलगुरु (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल. जबाबदार प्रशासकीय अधिका-यांची नियुक्ती करुन सुविधा व अभ्यासक्रमविषयक व्याप्ती इ. कामकाज गतीमानतेने करण्यात येईल. विदयापीठांतर्गत आवश्यक प्रशासकीय रचना तसेच मनुष्यबळाची नियुक्ती आवश्यक तरतूदीसह केली जाईल.

६) एन. आय. एस. धर्तीवर क्रीडा मार्गदर्शक घडविण्यासाठी एम. आय. एस. अभ्यासक्रम सुरु करण्यात येईल.

## ८. राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन

### ८.१ एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन

**अ. प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यासाठी आर्थिक सहाय्य :-**

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ करण्यामध्ये, तसेच खेळाचा प्रचार व प्रसार



करण्यामध्ये एकविध खेळ संघटना मोलाचा वाटा उचलतात. राज्य संघटनांद्वारा राष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात. त्यांना अर्थसहाय्य देण्याची सध्या योजना आहे. यामध्ये सुधारणा करुन एकविध खेळ संघटनासाठी किमान ५ दिवसांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे अनिवार्य करावे. प्रशिक्षण शिबिरासाठी खेळाडू,मार्गदर्शक यांना प्रतिदिन रु. १५०/- निवास व भोजन खर्च तसेच प्रवास खर्च, मैदान सेवकांसाठी व सादील खर्च, वैद्यक खर्च व इतर बाबींसाठी अनुदान रु. ५,०००/- देण्यात येईल.

**ब. एकविध खेळाच्या राज्य संघटनांना देण्यात येणा-या प्रोत्साहन अनुदानात वाढ :-**

एकविध खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाना विविध खेळात नेत्रदीपक कामगिरी बजावण्यासाठी संबंधित खेळांच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन देण्यासाठी यामध्ये भरीव स्वरुपात वाढ करण्यात येईल. वैयक्तिक व सांघिक गटातील पदक धारक खेळाडूंना प्रत्येकी सुवर्ण रु. २००००/-,रौप्य रु. १५०००/-,कास्य रु. ५०००/- देण्यात येईल.

**क. अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांकरीता राज्याचा संघ सहभागी करण्यासाठी राज्य संघटनांना सहाय्य :-**

अधिकृत राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी राज्यसंघटनांना आर्थिक सहाय्याच्या मर्यादेत खालील प्रमाणे वाढ करण्यात येईल.

- राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रेल्वेच्या दुस-या वर्गाचे भाडे, राज्य परिवहन

मंडळाचे सवलत दराचे भाडे.

- खेळाचा गणवेष रु.५००/-, ट्रॅकसूटसाठी रु.५००/- प्रति खेळाडूस देण्यात येईल.
- खेळाडू,व्यवस्थापक व मार्गदर्शक यांना प्रवास व स्पर्धा कालावधीसाठी हातखर्ची भत्ता प्रतिखेळाडू रु.१००/- देण्यात येईल.

## ८.२ महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे

महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्था, एकविध संघटना बळकट करण्यासाठी क्रीडा स्पर्धा, क्रीडा साहित्य, निर्वाह अनुदान इत्यादी बाबींसाठी शासनामार्फत अनुदान देण्यात येत आहे. या अनुदान मर्यादेत खालीलप्रमाणे बदल करण्यात येतील.

| अ.क्र | संस्था | बाब | प्रचलित अनुदान मर्यादा | नविन अनुदान दर |
|---|---|---|---|---|
| १. | राज्य संघटना | निर्वाह अनुदान | राज्य संघटनेशी सलग्न प्रत्येक जिल्ह्यामागे रु. १०००/- किंवा प्रत्येक खर्चाच्या ५० टक्के | राज्य संघटनेशी सलग्न प्रत्येक जिल्ह्यामागे रु. ५०००/- किंवा प्रत्येक खर्चाच्या ५० टक्के |
| | | क्रीडा साहित्य | रु. ५०००/- | रु. २५,०००/- |
| २. | जिल्हा संघटना | निर्वाह अनुदान | रु. ५०००/- | रु. २०,०००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| | | क्रीडा साहित्य | रु. ५०००/- | रु. २०,०००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| ३. | स्थानिक मंडळे, क्रीडा संस्था | निर्वाह अनुदान | रु. ५००/- | रु. ३,०००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| | | क्रीडा साहित्य | रु. २०००/- | रु. ३०००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| ४ | राज्य संघटना, क्रीडा मंडळे, | स्पर्धा अनुदान | अ. राज्यस्तरीय स्पर्धा रु. १.०० लाख<br>ब. राष्ट्रीय स्पर्धा रु. २.०० लाख<br>क. आंतरराष्ट्रीय स्पर्धा रु. २.०० लाख | **अ**. राज्यस्तरीय अजिंक्यपद-खुला गट स्पर्धा रु. ४.०० व इतर गटासाठी रु. २.०० लाख<br>**ब**. राष्ट्रीय अजिंक्यपद खुला गट स्पर्धा रु. ८.०० लाख इतर गटासाठी तसेच शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा रु. ५.०० लक्ष<br>**क**. अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा रु.२०.०० लक्ष |

## ८.३ क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग

क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविण्यासाठी शासनाचे निर्णय आहेत. राज्यात आयोजित होणा-या विविध स्पर्धांना प्रोत्साहन व उत्तेजन मिळावे या हेतूने औदयोगिक प्रतिष्ठाने, सहकारी संस्था, कारखाने, बँका, महामंडळे, वाणिजिक प्रतिष्ठाने यांनी क्रीडा विकासात काम करणा-या मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्थांना प्रायोजकत्व देऊन आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यासाठी सहाय्य करणे, क्रीडा साहित्य आयात करणे, खेळाडूंच्या परदेशी प्रशिक्षणाचा खर्च करणे आहे.

मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालये ,बॅंका,संस्था इ.च्या निदर्शनास ही बाब आणून देणे आवश्यक आहे. राज्य क्रीडा विकास निधी, जिल्हा क्रीडा परिषद, संकुल समित्या यांना क्रीडा उपक्रमासाठी संबंधित प्राधिकरणाने सहाय्य करावे. प्रतिवर्षी क्रीडा विकासाच्या बाबीवर खर्च करणे प्राधिकरणांना बंधनकारक करण्यात येईल. शासनामार्फत याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येईल.

## ८.४ क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण व सहाय्यक अनुदान इ.करिता क्रीडा प्रकारांची वर्गवारी करणे

ऑलिंपिक, अशियाई, स्पर्धेतील क्रीडा प्रकार तसेच राज्यातील पारंपारिक खेळ यांच्यावर लक्ष केंद्रीत करुन भविष्यात नामांकित स्पर्धेत पदक मिळविण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे. यामध्ये  सहाय्यक अनुदान, प्रशिक्षण या बाबींचा विचार करुन खालीलप्रमाणे खेळांची वर्गवारी करण्यात येईल.

●ऑलिम्पिक स्पर्धेत अतंर्भूत असणारे महत्वाचे खेळ तसेच राज्यातील महत्वाचे पारंपारिक खेळ (ब-गट) यामध्ये (उदा. कबड्डी, खो-खो, कुस्ती व मल्लखांब) अशी वर्गवारी करण्यात येईल. आणि इतर खेळ हे तिस-या गटात (क-गट) असावेत.

●महाराष्ट्र राज्याला पुढील पाच वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करता येईल असे 'ब' गटातील खेळ निवडून त्यांचा 'अ' गटात समावेश करावा . अ गटात समावेश झालेल्या खेळांवर विशेष लक्ष देऊन सर्व बार्बीमध्ये (सहाय्यक अनुदान, प्रशिक्षण ) प्राधान्य देण्यात येईल.

| क्रीडा प्रकारांची वर्गवारी | | |
|---|---|---|
| अ गट | ब गट | क गट |
| ॲथलेटिक्स | ॲथलेटिक्स | कॅनॉईंग ॲण्ड कयाकिंग |
| तिरंदाजी | तिरंदाजी | कॅरम |
| ॲक्वेटिक्क | ॲक्वेटिक्क | बॉडी बिल्डींग |
| बॅडमिंटन | बॅडमिंटन | आट्यापाट्या |
| बॉक्सिंग | बॉक्सिंग | स्केटींग, रोलर स्केटींग |
| बास्केटबॉल | बास्केटबॉल | रिंग टेनिस |
| सायकलिंग | सायकलिंग | बेसबॉल |
| जिम्नॅस्टिक्स | जिम्नॅस्टिक्स (ऑर्टीस्टीक,रिदॅमिक,ट्रॅम्पोलिन) | शूटींग बॉल |
| हॅण्डबॉल | हॅण्डबॉल | ब्रीज |
| -- | ज्युदो | क्रिकेट |
| कबड्डी | कबड्डी | थ्रोबॉल |
| खोखो | खोखो | रोलबॉल |
| टेनिस | टेनिस | योगासने |
| शूटींग | शूटींग | डॉजबॉल |
| रोईंग | रोईंग | कॉर्कबॉल |
| टेबलटेनिस | टेबलटेनिस | नेटबॉल |
| - | ट्रायथलॉन | सिकई |
| व्हॉलिबॉल | व्हॉलिबॉल | वुशु |
| - | वेटलिफिटंग | कराटे |
| कुस्ती | कुस्ती | किक बॉक्सिंग |
| हॉकी | हॉकी | रस्सीखेच |
| - | तायक्वांदो | बुध्दीबळ |
| फूटबॉल | फूटबॉल | स्कॅश |
| | मल्लखांब | सायकलपोलो |
| - | तलवारबाजी | पॉवरलिफ्टींग |
| - | सेलिंग | ब्रिलियडर्स |
| - | सॉफ्टबॉल | यार्टिग |
| - | | बॉल-बॅडमिंटन |
| - | - | वेटलिफ्टींग |
| - | - | स्कुल गेम्स मधील खेळ |

## ९. राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन

### ९.१ महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरची स्थापना करणे

महाराष्ट्र राज्याला समृध्द असा वारसा आहे. यामध्ये ७२० किलोमीटरचा समुद्र किनारा, सह्याद्रीच्या पर्वत रांगा, सातपुडा पर्वत ज्यामध्ये १६४८ मीटर उंचीचे कळसूबाई शिखर, पाचगणीचे पठार, चिखलदरा, लोणारचे सरोवर, मेळघाट, ताडोबा, नागझिरा इत्यादी महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत. या भौगोलिक विविधतेचा वापर साहसी क्रीडा प्रकारांच्या विकासासाठी करता येणे शक्य आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साहसी क्रीडा प्रकाराला विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. या साहसी क्रीडा प्रकारातून महाराष्ट्र राज्यातील अनेक खेळाडुंनी राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर किर्तिमान स्थापित केलेले आहे.

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक परिस्थिती साहसी क्रीडा प्रकारासाठी पूरक आहे. राष्ट्रीय स्तरावर नियमित होणारे स्पर्धात्मक क्रीडा प्रकार, केंद्र शासनाद्वारे साहसी क्रीडा प्रकाराला पुरस्कृत करणा-या योजना इ. विचार करता साहसी क्रीडा प्रकार तीन भागात विभागल्या जातात १. जल क्रीडा प्रकार २. वायु क्रीडा प्रकार ३. स्थल क्रीडा प्रकार या तीन प्रकारामध्ये स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक (मनोरंजनात्मक) अशा बाबी आहेत.

साहसी क्रीडा प्रकारामुळे नेतृत्वगुणांचा विकास, धैर्य, चिकाटी, कल्पकता, साहसी वृत्ती, निसर्गाशी एकरुपता, सकारात्मकता, सांघिक भावना रुजणे, समन्वय इत्यादी बाबींचा विकास होतो. विदेशामध्ये साहसी खेळांचा वापर शाळांमध्ये तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यामध्ये, विद्यार्थी व कर्मचा-यांच्या क्षमतांच्या वाढीसाठी केला जातो. आपत्ती व्यवस्थापनासाठी साहसी खेळांची अतिशय गरज आहे व यातील तंत्रे जगभरातील पोलिस दले, लष्कर तसेच सर्व निमलष्करी दले शिकतात व याचा वापर करतात .

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक परिस्थिती ही साहसी उपक्रमांना पोषक अशी आहे. भारतामध्ये एरो स्पोर्टस, वॉटर स्पोर्टस, व माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्टस् या तिन्ही प्रकारासाठी अद्याप एकत्रित अशी कोणतीही प्रशिक्षण संस्था कार्यरत नाही. वॉटर स्पोर्टससाठी गोव्यामध्ये प्रशिक्षण संस्था (नॅशनल इंस्टीटयुट ऑफ मरीन स्पोर्टस्, गोवा) कार्यरत आहे. माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्टस्साठी डायरेक्टरेट ऑफ माऊंटेनिअरींग ॲण्ड अलाईड स्पोर्टस्(DMAS) मनाली (हिमाचल प्रदेश), नेहरु इंस्टीटयुट ऑफ माऊंटेनिअरींग, (NIM), उत्तर काशी (उत्तरांचल), हिमालयीन माऊंटेनिअरींग इंस्टीटयुट (HMI) दार्जलिंग, (पश्चिम बंगाल), जवाहर इंस्टीटयुट ऑफ माऊंटनिअरिंग बटोट, (JIM) (जम्मु -काश्मिर) या संस्था कार्यरत आहेत.या संस्थामध्ये लाईफ सेव्हींग कोर्स, पॉवर बोट हँडलिंग कोर्स, स्कूबा डायव्हींग, स्नॉर्कलिंग , ॲडव्हेंचर कोर्स, रॉक क्लाईंबिंग कोर्स, माऊंटनिंअरींग कोर्स , हॉटएअर बलून हॅन्डलिंग कोर्स इ. अभ्यासक्रम राबविले जातात. राज्यातील खेळाडूंना या प्रशिक्षणाची सुविधा राज्यात नसल्याने वंचित रहावे लागते, या करीता राज्यात **ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरची स्थापना करण्यात येईल.** या केंद्रामध्ये खालील उपक्रम राबविण्यात येतील.

- एरो स्पोर्टस्, वॉटर स्पोर्टस् व माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्टस् ,स्पोर्ट क्लाईंबिंग या सर्व साहसी खेळाचे प्रशिक्षण राबविणे.
- साहसी खेळांच्या सुविधा सेंटरमध्ये विकसित करणे
- साहसी क्रीडा व पर्यटन महोत्सव आयोजित करणे व पर्यटनाला चालना देणे.
- साहसी खेळांच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम कार्यान्वित करणे.
- राज्यामध्ये साहसी क्रीडाप्रकारांना चालना देणा-या स्वयंसेवी संस्थांना मान्यता,परवाना देणे.
- साहसी क्रीडा स्पर्धांचे आयोजन व नियमन करणे.
- नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित करणे.

- साहसी खेळांचा प्रसार व प्रचार करणे. इ.
- लाईफ सेव्हिंग्ज जीवन रक्षक अभ्यासक्रम राबविणे.






तरुणांमध्ये साहस विषयी भावना रुजविणे, सर्वसामान्य युवकांसाठी साहसी खेळाची उपलब्धता करुन देणे, आंतरराष्ट्रीय स्तराच्या साहसी स्पर्धांसाठी युवकांना तयार करणे,छोटया छोटया साहसी पर्यटनाला चालना देणे, साहसी पर्यटनाच्या माध्यमातून युवकांना सेवासंधी उपलब्ध करुन देणे, पोलीस अग्नीशामक व औद्योगिक व्यवसायातील अतितात्कालिन व आपत्कालीन सेवा देणारी तुकडी तयार करण्यासाठी प्रशिक्षण देणे, साहसी क्रीडेच्या क्षेत्रामध्यें हे सेंटर नियंत्रण संस्थेच्या रुपाने कार्य करेल. या सेंटरमध्ये विकसित करावयाच्या सुविधा व व्यवस्थापनासाठी आर्थिक तरतूद केली जाईल.

## ९.२ साहसी खेळांच्या क्रीडा सुविधांची निर्मिती करणे

राज्यातील भौगोलिक विविधता साहसी खेळांच्या सुविधा निर्मितीसाठी अनुकूल आहे.या भौगोलिक विविधतेचा वापर करुन राज्यामध्ये ठिकठिकाणी साहसी खेळांच्या सुविधा निर्माण करता येतील यामध्ये धरणे, तलाव, समुद्र किनारा, नदी या ठिकाणी वॉटर स्पोर्टस्च्या सुविधा तसेच डोंगर रांगामध्ये गिर्यारोहणाच्या व एरोस्पोर्टस च्या सुविधा निर्माण करता येतील. क्रीडा संकुले, मनोरंजन केंद्र, उदयाने, पर्यटन स्थळे इ. ठिकाणी कृत्रिमरीत्या साहसी क्रीडा सुविधा निर्माण करणे शक्य आहे.



साहसी खेळांच्या क्रीडा सुविधा मध्ये क्लाईंबिंग वॉल, बोल्डर पार्क,डायनो, हायरोप कोर्स, ऑबस्टॅकल कोर्स, बंजी जम्पींग इ सुविधा विकसित करणे आवश्यक आहे. तसेच भौगिलिक परिस्थितीचा आढावा घेवून जल क्रीडा प्रकारा मधील कॅनाईंग, वॉटर स्कीईंग,रोईंग,याटिंग,स्क्युबा डायव्हिंग,सेलिंग इ. व वायु क्रीडा प्रकारां मधील पॅरा ग्लायडिंग,पॅरासेलिंग ,हॉट एअर बलुनिंग इ.,तसेच स्थल क्रीडा प्रकार स्पोर्ट क्लाईंबिंग ,रॉक क्लाईंबिंग, ट्रेकिंग , माऊंटन सायकलिंग, ऑल टेरेन बाइक, झीप लाइन इ. सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वेक्षणव्दारे जागांची निश्चिती करुन सुविधां विकसित करण्यात याव्यात. सुविधा निर्माण करण्यासाठी शासन कृतिकार्यक्रम हाती घेईल. साहसी खेळांच्या सुविधा विकसीत करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था,संकुल समितीना अनुदान देण्यात येईल.पर्यटन विभागाचे सहकार्याने साहसी क्रीडा प्रकारांच्या सुविधा विकसित केल्यास पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल.

अ) विभागीय क्रीडा संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्लाईंबिंग वॉल, ॲडव्हेंचर स्पोर्टस् पार्कची निर्मिती तसेच जिल्हा क्रीडा संकुलामध्ये राष्ट्रीय दर्जाची क्लाईंबिंग वॉल,

ॲन्डव्हेंचर पार्कची निर्मिती करण्यात यावी. महानगरपालिका, नगरपालिका यांनी खेळ, उद्यान/बालनगरी साठी आरक्षित ठेवलेल्या जागेवर साहसी खेळांच्या सुविधा उभारण्यात येतील.

ब) नोंदणीकृत संस्था, साहसी क्रीडा संस्था, संघटना यांना क्लाईंबिंग वॉल व साहसी खेळाच्या सुविधा विकसित करण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

क) क्रीडांगण विकास योजनेअंतर्गत विविध खेळांच्या सुविधा निर्माण करणे तसेच व्यायामशाळा बांधकाम व साहित्यासाठी क्रीडा विभागामार्फत अनुदान देण्यात येते या योजनेअंतर्गत साहसी खेळाच्या निर्मीती तसेच त्यांच्या प्रशिक्षण, स्पर्धांसाठी आवश्यक अनुदान देण्याची तरतूद करण्यात येईल.

## ९.३ साहसी खेळाच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन.



मुलांमध्ये धैर्य, चिकाटी, सांघीक भावना, सुप्त गुणांना चालना देऊन सर्वांगीण विकास करण्यासाठी साहसी खेळांच्या बाबीं अधिक फायदेशीर आहेत. साहसी खेळाचा विकास होण्यासाठी राज्यामध्ये जिल्हा, विभाग, राज्य ,राष्ट्रीय,आंतराष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धा प्रशिक्षण आयोजन करणे आवश्यक आहे तसेच साहसी सप्ताह साजरा करण्यात यावा. यामध्ये सेलिंग, पॅराग्लायडिंग, स्पोर्टस व रॉक क्लाईंबिंग, समुद्र व खाडी पोहणे, टूर द फ्रान्सच्या धर्तीवर टूर द महाराष्ट्र सायकलिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल.

## ९.४ साहसी क्रीडा पुरस्कार

राज्याचे नांव आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करणा-या खेळाडूंना, मार्गदर्शक, क्रीडा संघटक यांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यामध्ये खाडी पोहणे, गिर्यारोहण, शिडाच्या होडीतून समुद्र प्रवास, सायकलिंग जगप्रवास, मोटोक्रॉस, पॅराग्लायडिंग, पॅराजंपिंग, आईसस्केटींग या साहसी क्रीडा प्रकारातील बाबींसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा विशेष पुरस्कार देण्याची तरतूद आहे.

साहसी खेळामध्ये एरो स्पोर्टस्, वॉटर स्पोर्टस् व माऊंटेनिअरींग ॲन्ड अलाईड स्पोर्टस् या तीन प्रकारांचा समावेश आहे. या प्रकारांमध्ये विविध बाबींचा अंतर्भाव असून त्या सर्वस्वी भिन्न आहेत. (उदा. पॅराग्लायडिंग, पॅरासेलिंग, हॉट एअर बलुनिंग, वॉटर स्कीईंग, सेलिंग, तसेच स्पोर्ट क्लाईबिंग इ. )



पुरस्कार देताना एरोस्पोर्टस् व वॉटर स्पोर्टस्, माऊंटेनिअरींग व अलाईड स्पोर्टस यांचा स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल. साहसी क्रीडा पुरस्कार देताना तीन बाबींसाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येतील. तसेच स्पोर्ट क्लाईंबिंग हा क्रीडा प्रकार स्पर्धात्मक असून राज्य-राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जात आहे. या खेळामध्ये प्राविण्य संपादन करणा-या खेळाडूंना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. या खेळाचा समावेश पुरस्कार नियमावलीच्या क्रीडा प्रकारात केला जाईल व यासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येईल. साहसी उपक्रमांतील कामगिरीसाठी देण्यात येणा-या शिवछत्रपती राज्य क्रीडा विशेष पुरस्कार हा शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी पुरस्कार या नावाने प्रतिवर्षी देण्यात येईल.

## ९.५ साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्थां व खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे



राज्यात साहसी खेळाला प्रोत्साहन, प्रचार व प्रसार स्पर्धेच्या माध्यमातून करण्याचे कार्य नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांव्दारे चालू आहे. या संस्थांना महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद यांच्या सहाय्यक अनुदान योजनेतून आर्थिक मदत करण्यासाठी नियमामध्ये बदल करण्यात येतील. हिमालयातील गिर्यारोहण मोहीमांना रु.४.०० लक्ष मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

## ९.६ साहसी खेळांच्या विकासाचे कार्य करणा-या संस्थांना क्रीडा साहीत्यासाठी अनुदान देणे

राज्यात साहसी खेळा मधील उपक्रमासाठी लागणारे साहित्य महाग असल्याने संस्थांना सहाय्य करणे गरजेचे आहे यामुळे विविध संस्था पुढाकार घेऊन विकासात्मक कार्य करतील. सदयस्थितीत या खेळाच्या क्रीडा साहित्यासाठी अनुदान देण्यात येत नाही.राज्यशासन व क्रीडा संस्था यांचे ७५:२५ हिश्याच्या प्रमाणात रु.५०.०० लक्ष मर्यादेत अनुदान देण्यात येईल. गत तीन वर्षात साहसी खेळात कार्य करणा-या संस्थांना याचा लाभ दिला जाईल.

# १०. क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना

## १०.१ क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना

क्रीडा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी राज्यात होण्यासाठी क्रीडा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा, प्रचलित योजनांमध्ये सुधारणा तसेच क्रीडा धोरणातील शिफारशी शासनाकडून मान्य करुन घेणे. इत्यादी महत्वपूर्ण बाबींसाठी “क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना” करणे आवश्यक आहे. या समितीची रचना खालीलप्रमाणे असेल. तसेच क्रीडा धोरण तयार करताना ज्या सदस्यांचा गठीत समितीमध्ये सहभाग होता त्या सदस्यांना अंमलबजावणी समितीत प्राधान्य देण्यात येईल. समितीच्या बैठका वर्षातुन किमान चार वेळा आयोजित करुन क्रीडा धोरणाचा आढावा घेण्यात येईल. कालानुरुप बदल करण्याच्या शिफारसी ही समिती वेळोवेळी करेल.

### क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समिती रचना

| | |
|---|---|
| अध्यक्ष | मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य |
| सहाध्यक्ष | मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण |
| उपाध्यक्ष | मा.राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण |
| सदस्य सचिव | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग |
| सदस्य | विधान सभा सदस्य - ८ (विधानसभा अध्यक्षांनी शिफारस केलेले)<br>विधान परिषद सदस्य - २ (विधानपरिषद सभापतींनी शिफारस केलेले)<br>खासदार प्रतिनिधी - २ (मा.मुख्यमंत्र्यांनी शिफारस केलेले) |
| | प्रधान सचिव - वित्त, प्रधान सचिव - नियोजन |
| | क्रीडा धोरण उपसमिती अध्यक्ष |
| | शिक्षण संचालक/सहसंचालक |
| | अर्जुन पुरस्कारार्थी -२, शिवछत्रपती पुरस्कारार्थी – खेळाडू २,संघटक-२ |
| | क्रीडा संचालनालयाचे प्रतिनिधी -२ (संचालक व सहसंचालक) |

(क्रीडा धोरण तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समिती मधिल विधान सभा/विधान परिषद सदस्यांना प्राधान्य देण्यात येईल.) क्रीडा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर समिती नियुक्त करण्यात यावी या समितीनी वर्षातून दोन बैठका घेवून राज्यस्तरीय समितीला अहवाल दयावा.)

## वित्तीय व्यवस्था :—

कोणत्याही देशाची प्रगती याच्या मनुष्यबळ विकासावर अवलंबून असते हे तत्व लक्षात घेवून, क्रीडा क्षेत्रावर होणारा शासनाचा खर्च हा खर्च न मानता ती मानवी संसाधन विकासासाठी अत्यावश्यक असणारी गुंतवणूक मानण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे.त्यासाठी महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२-२०१७) अंदाजित रु.१४३४.७१ कोटी इतका निधि क्रीडा विकासासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी प्रचलित योजनांमध्ये सुधारणा करतानाच काही नवीन योजना लागू करण्यात येतील. त्याची कार्यवाही स्वतंत्रपणे केली जाईल.